म. ग्रं. सं. ठाणें

विषय पौराणिक

लेखक द. ग. सडेकर

सन १८८५

संग्रहालय क्रमांक २९ / १९३

पुस्तकाचें नांव पौराणिक चरित्रमाला पुस्तक १ ले

२९ / १९३

सं. क्र.

# पौराणिक चरित्रमाला

## पुस्तक १ ले.

(पौराणिक)

ग्रं. सं. टाणें
१०-१८२०

सच्चिदानंद.

# पौराणिक चरित्रमाला.

## पुस्तक पहिलें.

प्रसिद्ध करणार

लोकमित्रकर्ते.

खानापूर–धनंजय–छापखाना.

सन १८९७ इसवी.

किंमत चार आणे.

प्रत्येक प्रतीस ट. ख. ०॥

नं. ........
ता. ........


[illegible]लासवासी [illegible]

[illegible] निळकंठ पट[illegible]

[illegible] स्मरणार्थ,

[illegible]राठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,

[illegible] नजर.

ग. स. पटवर्धन.

९-१०-१२.

॥ श्रीलक्ष्मीविजयते. ॥

# पौराणिक चरित्रमाला.

## पुस्तक पहिलें.

## श्री दत्तात्रय चरित्र.



ब्रह्मा विष्णु महेश एक मिनती दत्तात्रयीं जाण वा ।
अत्रीपुत्र असे क्षितीवर असा माता अनूसूय वा ।
होई श्रेष्ठ तपोव्रतीं कलियुगीं पुण्या नसे साम्यही ॥
तारी भक्तजना असंख्य अघही जाळूनि त्यांचें मही ॥ १ ॥

ब्रह्मदेवाच्या सात मानस पुत्रांपैकीं अत्री महर्षि व त्याची पतिव्रता स्त्री अनुसूया ह्यांचे पोटीं श्री दत्तात्रयाचें जनन झालें. ती कथा अशीः— अनुसूयेच्या पातिव्रत्याबद्दल कळल्यानंतर नारदानें ब्रह्मा, विष्णु व महेश ह्या देवतांच्या स्त्रिया ज्या सावित्री, लक्ष्मी व पा

वैती ह्यांच्यापाशीं अतोनात वर्णन केलें व ' तुमचें पातिव्रत्य तिच्या पासंगासही पुरणार नाहीं ' असें सांगून तो तेथून चालता झाला. त्या तिघींना तो आपला अपमान झालासा वाटला. कारण, त्यांना आपापल्या पातिव्रत्याबद्दल फारच अभिमान होता. त्या तिघींनीं कट करून आपापल्या पतीजवळ, अनुसूयेचा छळ करून तिला तिच्या पातिव्रत्यापासून भंगविण्याबद्दल आळ घेतली. तिघांनीं ती गोष्ट कबूल करून, अत्री ऋषि स्नान-संध्येसाठीं मठाबाहेर गेले आहेत अशी संधि साधून, अतिथीच्या वेषानें त्यांच्या आश्रमांत प्रवेश केला व ' इच्छित भिक्षा दे ' ह्मणून साद घातली. अनुसूयेनें त्यांना आसनें वगैरे देऊन त्यांचे पाय धुतले व ताटें मांडलीं. तेव्हां ' तूं जर खरी पतिव्रता असशील तर आह्मां तिघांना नग्नपणानें वाढून आकंठ भोजन दे ' असा त्यांनीं हट्ट धरिला. अनुसूयेनें ठीक आहे, असें ह्मणून स्वयंपाकगृहांत जाऊन आपल्या पतीचें ध्यान केलें व आलेले अतिथि आपल्यास पुत्राप्रमाणें आहेत अशी भावना धरून ती नग्न होऊन त्यांना वाढण्यास आली. इतक्यांत केवळ तिच्या संकेताप्रमाणें खरोखर तीन अतिथि सुंदर व गोजिरवाणीं बालकें होऊन भुकेनें आक्रोश करीत असलेलीं तिच्या दृष्टीस पडलीं. तिनें त्याच स्थितींत प्रत्येकाला आळीपाळीनें स्तनपान देऊन आकंठ तृप्त केलें; आणि नंतर त्यांना पाळण्यांत घालून झोके देत व गाणीं ह्मणत बसली.

इतक्यांत माध्यानकाळ झाल्यामुळें, अत्री ऋषि भोजनार्थ घरांत आले. तों पोरें रडताहेत, आपली स्त्री त्यांना पाळण्यांत घालून हालविते आहे, व तोंडानें गाणीं गात आहे, असें पाहून ते त्रिकालज्ञ मुनि त्यांतील खरें मर्म ताडून

त्या तिन्ही बालकांना नमस्कार करितेझाले व त्यांनीं आपल्या स्त्रियेस ते कोण आहेत, ह्याची ओळख करून दिली. ह्याप्रमाणें सत्व घ्यावयास गेलेले तिन्ही देव पाळ-ण्यांत खेळूं लागतांच पुनरपि नारदाची स्वारी त्यांच्या पत्न्यांकडे गेली. त्यांनीं त्याची पूजा करून आपापले पति कोठें व कशा स्थितींत आहेत ह्मणून त्याला प्रश्न करितां-च त्यानें हांसून उत्तर केलें कीं, ते तिघे त्या महान पति-व्रतेनें बालक करून त्यांना सांप्रत ती न्हाणें-माखणें घालीत आहे. असें सांगून तो उठला. तेव्हां त्यांनीं फिरून त्याची विनवणी करून पतींच्या मुक्ततेचा उपाय त्यास विचारला. तेव्हां 'तुह्मीं तिघींनीं त्या पतिव्रता-शिरोमणीस शरण जाऊन पतिदान-भिक्षा मागितल्यास तुमचे पति तुह्मांला मिळतील, पाहिजे असल्यास आतांच माझ्याबरोबर चला, ह्मणजे मी ही तुमच्या वतीनें बनेल तेवढी रदबदली करून पाहीन.' असें नारदाचें भाषण ऐकतांच देवांच्या स्त्रियांनीं मानवी स्त्रीस नमन करणें ह्मणजे मोठीच नामुष्की असें जरी त्या जाणून होत्या, तरी पतींच्या मुक्ततेचा अन्य मार्गच त्यांना सुचत नसल्यानें आपापलीं नाकें मुठींत धरून चरण-चालीनें त्या ब्रह्मर्षीबरोबर निघाल्या.

ज्यांना पाउलभर चालण्याचादेखील सराव नाहीं अशा त्या सुकुमार वनितांना खळ्यांतून, कंटकांतून, दऱ्याखोऱ्यांतून व मोठमोठाले पर्वत ओलांडून जाण्याचा प्रसंग आल्यानें, त्यांच्या पायांच्या चिंधळ्या उडाल्या. सर्वांगें घामानें चिंब झालीं. तोंडें शेंदराप्रमाणें आरक्त झाल्यानें त्यांतून आतांच रक्तस्राव होतो कीं काय असें वाटूं लागलें. घसे कोरडे पडले, पाय उचलेनात, उठत

बसत कशा तरी त्या एकदांच्या इच्छित स्थळीं येऊन पोहोंचल्या व त्यांनीं अनुसूयेस नमन करून, आपापले पति परत दान करण्याबद्दल तिच्यापुढें पदर पसरले.

त्याबरोबर पाळण्यांतून तिन्ही बालकें काढून आणून अनुसूयेनें त्यांच्यापुढें ठेवलीं, व ह्यांतून आपापला नवरा प्रत्येकीनें ओळखून घ्यावा, असें त्यांना सांगितलें. तेव्हां त्या तिघीही टकमक तिच्याच तोंडाकडे पाहात उभ्या राहिल्या कारण, त्या तिन्ही मूर्ती एकरूप, एकरंग, एकवय व एकाच सांचाच्या असल्यानें त्या तिघींतून आपला पति अमूकच, असें त्यांना ओळखतां येईना.

तेव्हां नारदानें ह्या आतां अगदीं गलिताभिमान झाल्या आहेत असें पाहून अनुसूयेस त्यांचे पति त्यांना परत देण्याची विनंति केली. त्या महर्षीच्या वचनास मान देऊन त्या साध्वीनें आपल्या पतीच्या पायाचें तीर्थोदक आणून त्यांजवर सिंचन करितांच ब्रह्मा, विष्णु व महेश ह्या मूर्ति तथेंच उत्पन्न झाल्या. 'आजपर्यंत मला लळा लावून आतां माझा त्याग करणें आपणांसारख्या देवांस उचित वाटत असल्यास, आपल्या जाण्यास मी आडकाठी आणूं इच्छित नाहीं. पण आपापल्या अंशाचा एकेक पुत्र मला असावा अशी माझी मनीषा आहे, ती पूर्ण करणें किंवा न करणें आपल्या स्वाधीन आहे.' असें तिचें मातृ-प्रेमाचें वचन ऐकून रुद्रांशानें दुर्वास, विधिअंशानें चंद्र, व विष्णुअंशानें श्री दत्तात्रय अशीं तीन मुलें तिच्या घरीं राहून, त्या तिघांनीं आपापल्या पत्न्यांसह स्वर्गी गमन केलें. त्रिवर्गांच्या मौंजीबंधनानंतर दुर्वास व चंद्र यांनीं तपश्चर्येस जाण्याची मातेजवळ आज्ञा मागून, आ-

आपल्या अंशाची स्थापना त्या श्री दत्तमूर्तीत केली. 'हा कांहीं काळपर्यंत तुझ्या सेवेंत राहून, नंतर लोकोद्धारार्थ पृथ्वीवर ब्रह्मचर्य वृत्तीनें स्वेच्छक्रीडा करील. कारण, कलियुगांत अभक्तीनें किंवा भक्तीनें घडणाऱ्या असंख्य पापाचे निरसनार्थ असा एखादा तरी अवतार असणें योग्य होय.' असें सांगून ते चंद्र व दुर्वास तपश्चर्येला निघून गेले.

ह्याप्रमाणें श्री दत्तात्रयाचें जनन झालें. कलियुगांत असंख्य दैवतें असून, धर्माचे अनेक पंथ अस्तित्वांत आहेत. त्या सर्वांचें एकीकरण करून त्यांचे अनुयायांना एका वेदांत मार्गाचे दावणींत गोंवण्यासाठीं जशी पंचायतनपूजा शंकराचार्य अस्तित्वांत आणते झाले, त्याचप्रमाणें शैव व वैष्णव ह्या उभय परस्पर मतविरोध्यांना श्री दत्तात्रयाची भक्ति करणें सवयड झालेलें आहे. ब्रह्मदेवास शंकरशापानें अपूज्य मानलेला असतांही श्री दत्तात्रयपूजनानें तोही त्या पूजेचा भागीदार बनतो. असो श्री दत्तात्रयांनीं नामधारक शिष्यास दर्शन दिलें. सत्शिष्य संदीपक ह्यानें आपल्या कुष्टी गुरूची वाराणसी क्षेत्रांत खडतर सेवा केली. त्याच्या सेवेनें श्री काशीविश्वेश्वर संतुष्ट होऊन त्याला वर देण्यास आले. परंतु, 'गुरूची आज्ञा नाहीं व मी प्रत्यक्ष तुमची सेवाही पण केली नाहीं ह्मणून मला वरप्रदान नको' असा खडखडीत जबाब त्यानें त्यांना दिला. नंतर श्री विष्णु आले, त्यांनाही असेंच त्यानें रोख ठोक उत्तर दिलें. पण भगवंतांनीं अत्याग्रह केल्यावरून, मला अजन्म गुरुभक्ति घडावी असाच त्यानें त्यांच्यापाशीं वर मागून निमित्त टाळलें. अखेर त्याच गुरूनें त्याला अभिष्ट

वरप्रदान करून नामधारक शिष्यास आपलेबरोबर घेऊन जाऊन, आमरजा संगमीं आपले मठांत त्याला अंबरीष व दुर्वास ह्यांचा महिमा सांगितला.

पीठापूर गांवीं सुमाता नामें एका स्त्रीवर, भिक्षादानानें प्रसन्न होऊन श्रीपाद या नामेंकरून तिचे पुत्र झाले व तिच्या दोन अपंग मुलांस धट्टेकट्टे करून नंतर तीर्थयात्रेस जाते झाले. वशिष्ट ऋषीच्या शापानें राक्षसदेह पावलेल्या मित्रासह राजास गौतमानें गोकर्ण क्षेत्राची उत्पत्ति व महिमा सांगून त्याला ब्रह्महत्येपासून मुक्त केला. श्रीपादस्वामी स्नान करीत असतां, तेथें एका विधवा स्त्रीचा मतिमंद पुत्र लोकोपहासानें त्रासून गंगेंत जीव देण्यास आला होता, परंतु त्याला बुद्धीप्रवर्धक शनिप्रदोष आचरण्यास सांगून बुद्धिवान करून सोडिलें.

कुरवपुरांतील एक रजक नित्य नियमानें श्री गुरूस त्रिकाल वंदन करीत होता. त्याला राज्यैश्वर्याची झालेली इच्छा तृप्त करून, फिरून दर्शन देण्याचें अभिवचन देऊन स्वामी गुप्त झाले. एक गुरुभक्त ब्राह्मण, चोरांनीं धनहरणार्थ मारिल्यामुळें श्रीपादस्वामींनीं त्या सर्व तस्करांचा वध करून त्या ब्राह्मणास जीवंत केलें. ज्या ब्राह्मणपुत्रास बुद्धिवर्धक शनिप्रदोषव्रत आचरण करण्यास श्रीपादस्वामींनीं सांगितलें होतें त्याची माता दुसऱ्या जन्मीं करंज पुरीं अंबा या नांवानें माधव द्विजाची पत्नि झाली. तेव्हां तिच्या सुकृतानें श्री नृसिंहसरस्वतीचा तिसरा अवतार तिच्या पोटीं होऊन मौंजिबंधनापर्यंत मुके असतां गायत्रीमंत्राची दीक्षा घेते वेळीं व भिक्षा मागतांना चाऱ्ही वेद मुखोद्गत ह्मणून दाखवून सर्वांना

तोंडांत बोटें घालावयास लाविलें. नंतर यतिदीक्षा घेऊन तीर्थयात्रा करण्यास जावयाची मातेजवळ आज्ञा मागतांच तिला पुत्रमोह उत्पन्न झाला. त्याचें निरसन ज्ञानकथनानें करून व तिला आणखी चार पुत्र व पांचवी कन्या देऊन काशींत आले आणि संन्यासदीक्षा घेऊन उत्तरेकडे तीर्थयात्रा करण्यास्तव गमन केलें. सर्व तीर्थयात्रा करून मातेस फिरून दर्शन दिलें, व गोदातीरीं असणाऱ्या कुक्षीव्यथापीडित ब्राह्मणास रोगनिर्मुक्त केलें.

स्वामीच्या सायंदेव शिष्यास यवन राजानें पाचारण केल्यामुळें, त्याला अभय देऊन यवनराजास शासन केलें. सर्व शिष्यांना तीर्थमहिमा सांगून व त्याना तीर्थें करावयास धाडून, आपण वैजनाथपुरींत गुप्त रूपानें राहिले. नंतर एका ब्राह्मणास गुरुमहिमा सांगितला, व त्यावर ज्ञानानुग्रह करून भुवनेश्वरीजवळ भिलवडी मुक्कामीं जात झाले. तेथील भुवनेश्वरीदेवीजवळ एक मंदबुद्धि ब्राह्मण विद्याप्राप्तीस्तव तीन दिवस उपवास करून, शेवटीं देवीच्या पायांवर आपली जिव्हा छेदून वाहता झाला. त्याला देवीनें स्वामीकडे जाण्याचा दृष्टांत दिला, व त्याप्रमाणें त्यानें करतांच त्यास सर्व विद्या आपोआप फक्त स्वामीदर्शनानेंच प्राप्त झाल्या.

श्री गुरु तीर्थाटणें करीत करीत **नरसोबाचे** वाडीस येऊन तेथें द्वादश वर्षें राहिले. एके दिवशीं एका ब्राह्मणाचे घरीं भिक्षेस जाऊन, त्याचे द्वारांत पुरातन असलेल्या घेवड्याच्या झाडाचें मूळ तोडलें, व त्यांतच एक द्रव्य घट त्याला दाखवून त्याचें दारिद्य विच्छिन्न केलें. औदुंबराचें वर्णन करून, योगीनींनी केलेल्या पूजेनें संतोषून

त्यांस वरप्रदान केलें व गंगानुज नांवाच्या मनुष्यास बरोबर घेऊन एक दिवसांत त्रिस्थळी यात्रा केली आणि गाणगापुरास जाऊन गुप्तपणें नरसोबाचे वाडीस राहिले. शिरोळ येथील गंगाधर नांवाच्या ब्राह्मणाचे पुत्र कांहीं संबंधीक बाधेनें मृत होत असत. त्याला गुरुप्रसादानें झालेला पुत्र व्रतबंधसमयीं मृत झाला, तेव्हां विप्र स्त्रीस नश्वर जगाचा मोह न बाळगण्याबद्दल ज्ञानोपदेश करून ती स्त्री मृत पुत्राचें कलेवर वाडीस घेऊन आल्यावर, तो पुत्र जिवंत झाला.

श्रीगुरु गाणगापुरीं असतां एका ब्राह्मणाचे घरीं वांझ महिषी आहे, असें पाहून त्याच म्हशीचें त्या विप्रस्त्री-कडून दुग्ध काढविलें व त्याचीच भिक्षा ग्रहण करून. तिला अखंड दुभती केली. गाणगाग्रामींच्या राजानें श्रीगुरूस आपल्या आश्रमीं नेलें असतां, तेथें ब्रह्मराक्षसांचा उद्धार केला. कुमसी गांवांतील त्रिविक्रम भारती ह्यानें श्रीगुरूची कीर्ति ऐकून त्यांची निंदा केली. तें ऐकून गुरूनीं तेथें जाऊन त्याला विश्वरूप दाखविलें, व आपल्या पदीं लीन करून वर देते झाले. म्लेंच्छांपुढें वेद पठण करणारे दोन ब्राह्मण जयपत्र घेण्याचे इच्छेनें त्रिविक्रम भारतीजवळ आले. त्यांना त्यानें गुरूजवळच नेलें. तेथें गुरूनीं संपूर्ण वेदरचना त्यांना सांगितली व वेदांविषयीं वाद न घालण्याबद्दल उपदेशही केला. तथापि ब्राह्मणांची जयपत्रेच्छा जात नाहीं असें पाहून एका चांडाळास श्रीगुरूंनीं ज्ञान दिलें व त्याजकरवीं त्या उभयतांस वेदवादांत कुंठित करविलें; आणि तुम्ही ब्रह्मराक्षस व्हाल. असा त्या द्विजांना शाप दिला. नंतर त्या चांडाळास जन्मांतरींचीं पातकें व तन्नाशार्थ

धर्माधर्मविचार सांगून, त्याच्या स्त्री-पुत्रांच्या आग्रहास्तव त्यास पुन्हा पतितावस्था देऊन त्याला त्याच्या घरीं पाठविलें.

त्रिविक्रम भारतीस भस्ममहिमा सांगून, वामदेवानें भस्मस्पर्शानें ब्रह्मराक्षसाचा उद्धार केल्याचें कथानक तत्पुष्ट्यर्थ सांगितलें. गोपिनाथ ब्राह्मणाची पत्नि सावित्री, ही आपल्या व्याधीग्रस्त पतीस घेऊन श्रीगुरुदर्शनास जात असतां मार्गांत तिचा पति पंचत्व पावला. तेथें श्रीगुरूंनीं तिला दर्शन देऊन, नाना कथेच्या रूपानें ज्ञानोपदेश, पतिव्रतेचे धर्म, सहगमनाचें महात्म व प्रकार सांगितला त्यामुळें ती सहगमनास तयार होऊन श्रीगुरूस नमस्कार करण्यास आली असतां, ‘ सौभाग्यवती भव ’ असा तिला त्यांनीं अशिर्वाद देऊन तिचा मृत पति फिरून संजीवन केला, आणि रुद्राक्षधारणाचा व रुद्राध्यायाचा महिमा भद्रसेन राजाचे कथेच्या रूपानें तिला सांगते झाले. तिनें ब्रह्मोपदेश करण्याबद्दल श्री गुरूस विनविल्यावरून स्त्रियांना पतिवांचून अन्याचा उपदेश व्यर्थ होय, असें सांगून कचदेवयानी आख्यान, सोमवार व्रताचा महिमा व सिमंतिनी त्या व्रतानें वैधव्यमुक्त कशी झाली इत्यादि इतिहास श्री गुरूनीं तिला सांगितले.

गाणगापुरांतील कोणी एका ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणास, त्याच्या स्त्रीनें श्री गुरूच्या आज्ञेनें, परान्न भोजनास नेलें. तेथें श्री गुरूनीं साक्षात्कार दाखविल्यानें तीं उभयतां खिन्न होऊन श्री गुरूपाशीं आलीं. तेव्हां त्यांना कर्ममार्ग म्हणजे देवपूजा, संध्या, वैश्वदेव, भोजनविधि, भक्षाभक्षविचार, अतिथीचा योग्यप्रकारें सत्कार व

अशा आचारसंपन्नाची संतती व संपत्ति कशी वृद्धिंगत होते, इत्यादि त्यांना कथन करून, त्याचप्रमाणें वरदानही देत झाले. श्री गुरु गाणगापुरींत असतां, भक्तमंडळी येऊन ब्राह्मणभोजनें करीत असत. तेव्हां भास्कर नामें गरीब ब्राह्मणाच्या मनांत तोच हेतु येऊन त्यानें आपल्यापाशीं असलेलें तीन पात्रांचें साहित्य घेऊन तो श्री गुरुपाशीं आला. त्याचा शुद्ध भक्तिभाव पाहून तितक्याच सामानांत चार सहस्र पात्रें संतुष्ट करून, त्याला दारिद्र्यमुक्त केलें. त्याचप्रमाणें तेथील गंगा नामें साठ वर्षांची वंध्या स्त्री, श्री गुरूस नित्यानें आरती करीत असे. तिची इच्छा पुढील जन्मीं पुत्रवती व्हावें अशी होती. कारण, ह्या जन्मींचे पुत्र होण्याचे तिचे दिवस ह्मणजे तारुण्य निघून गेलें होतें. असें असतां तूं अश्वत्थाची सेवा कर, ह्मणजे पुत्र व कन्या तुला याच जन्मीं होतील, असें सांगून त्याचा विधीही सांगितला. तिनें त्याप्रमाणें करतांच तिचें रजोदर्शन बंद झालें असतांही त्या सेवेच्या प्रभावानें व गुरुकृपेनें तिला त्यल्या उतार वयांतही एक पुत्र व एक कन्या अशीं दोन आपत्यें झालीं.

नरहरी नामक कुष्ठी ब्राह्मणानें कुष्ठपरिहारार्थ गुरुसेवा करितांच, त्याला औदुंबराचें एक शुष्क काष्ठ देऊन त्याला दररोज पाणी घालण्यास सांगितलें. व ज्या दिवशीं ह्या वाळलेल्या लांकडास पल्लव फुटतील, त्या दिवशीं तूं रोगमुक्त होशील असेंही सांगितलें. त्यानें त्याप्रमाणें सात दिवस पाणी घालतांच लोक त्याला हसूं लागले, तरी त्याचा गुरुवचनावर पूर्ण विश्वास असल्यानें गुरुभक्तिपरायण शबरास जशी उत्तम गति प्राप्त झाली, तसें श्री गुरूनीं स्व-

सामर्थ्यानें तें मृतकाष्ट संजीवन करून त्या ब्राह्मणासही दिव्यदेही केला.

एक वेळीं नामधारकाचा पूर्वज सायंदेव ब्राह्मण गुरुसेवेसाठीं आला असतां 'आमची सेवा करणें फारच दुर्घट आहे, नीट विचार कर.' असें म्हणून त्याची भक्ति पाहण्यास्तव एके दिवशीं श्रीगुरु त्यास घेऊन संगमावर गेले. तेथें रात्रीं मोठा पाऊस व वादळ होऊन शीतनिवारणार्थ गांवांतून अग्नि आणवून त्याला गुरुभक्ति व काशीयात्राविधि त्यांनीं सांगितला. अवधूताज्ञेप्रमाणें ब्रह्मचारी ह्यानें काशी क्षेत्रांतील तिथिवारानुक्रमानें नित्य यात्रा करून, ईश्वरप्रसादानें इच्छित वस्तु प्राप्त झालेल्या त्यानें गुरूस व गुरुपत्नीस अर्पण केल्यानें गुरुप्रसाद झाल्याची कथा सायंदेवास सांगितली. नंतर स्वामीच्या आज्ञेनें सायंदेव स्त्रीपुत्रांना तेथें घेऊन आल्यावर अनंत व्रत करण्याची त्याला श्रीगुरूंनीं आज्ञा करून त्याचा महिम ही सांगितला.

गाणगापुरांत तंतुक नांवाचा भक्त श्रीगुरूची सेवा करीत असतां शिवरात्रीपर्वानिमित्त गांवांतील सर्व लोक श्री मल्लिकार्जुनाच्या यात्रेस जाण्यास निघाले. त्यांनीं तंतुकास येण्याबद्दल अतोनात आग्रह केला. पण गुरुची सेवा सोडून मी यात्रेस येत नाहीं, असा त्यानें त्यांना जबाब देतांच श्रीगुरूंनीं त्याला एका क्षणांत तीर्थयात्रा करवून आणलें, विमर्षण राजास स्त्रीसह सात जन्म राज्यप्राप्ति मल्लिकार्जुनाचे दर्शनानें झाल्याची कथाही सांगितली, व अंतीं त्याला शिवलोक प्राप्त झाला. एक नंदी नामक कुष्ठग्रस्त ब्राह्मण तुळजापुरी अंबादेवीजवळ तीन वर्षें आराधना करून, देवीच्या आज्ञेनें चंदला परमेश्वरीजवळ सात-

महिने पुरश्चरणें करून तिच्या आज्ञेनें श्रीगुरुजवळ आला. श्रीगुरूंनीं त्याला सोमनाथ ब्राह्मणाकडून संकल्प सांगवून पुष्कर तीर्थी स्नान करविलें. त्यायोगानें त्याचें सर्व कुष्ट गेलें, पण थोडेसें जंघेस राहिलें. तेव्हां 'तूं संशय धरून आल्यानें हें प्रायश्चित्त, आतां तूं आमची स्तुति कर म्हणजे हा शेष रोग जाईल.' असें त्याला सांगतांच त्या प्रमाणें करून तो रोगमुक्त झाला.

हिपरगी गांवांत नरकेसरी ब्राह्मण, कल्लेश्वर लिंगाची नित्य पूजा करून पांच कविता करी. त्याला लोकांनी स्वामीची स्तुति करावयास सांगतांच, मी मनुष्याची स्तुति करीत नाहीं. असें तो म्हणाला. त्याला स्वप्नात लिंगस्थानी श्रीगुरु असून, आपण त्यांची पूजा करीत आहें असा दृष्टांत होतांच तो जागृत होऊन श्रीगुरूला शरण आला. दिपवाळीचे सणानिमित्य श्रीगुरूला आपापल्या घरीं बोलविण्यासाठीं सात गांवचे सात शिष्य आले. त्यांस एकांतीं प्रत्येकास पृथक पृथक तुमचे घरीं येतों, व गांवातही राहतों असें सांगून सातही शिष्यांकडे गेले, व गांवांतही होतेच! पुढें सर्व भक्तमंडळी एकत्र मिळाल्यावर एकमेकांनीं गुरूला दिलेलीं वस्त्रें दाखवून, एकाच वेळीं स्वामी सर्व ठिकाणीं होते असें समजल्यावरून फार आश्चर्य करिते झाले.

एक शूद्र श्रीगुरु संगमावर जाते वेळीं त्यांना मार्गांत नित्य नमस्कार करी त्यास एके दिवशीं स्वामींनीं धान्य उत्पन्न होण्यापूर्वीं पिकाची कापणी करण्यास सांगितलें, त्याप्रमाणें त्यानें करतांच अतिवृष्टीनें सर्व गांवांतील शेतांचा नाश झाला व शूद्राच्या ओंघळ्याला फार अंकूर येऊन धान्य शतगुणीत झालें. श्री गुरूनीं शिष्यांला

प्रयागादि सर्व तीर्थें गांवासमीपच आहेत असें सांगून त्यांचा महिमा, अमरजा नदीची व वाराणशी क्षेत्राची उत्पत्ति झाल्याबद्दलची कथा सांगून पूर्वाश्रमभागिनी रत्नाबाईस तीर्थविधीनें कुष्टमुक्त केलें.

पूर्वीं ज्या रजकास यवनकुलांत राजा होण्याबद्दल गुरूंनीं सांगितलें होतें, तो सांप्रत वैदुरा देशचा राजा झालेला होता. त्याच्या जंघेस स्फोटकोद्भव झाल्यानें, रोगशांत्यर्थ सत्पुरुषाचें दर्शन घेण्यासाठीं ऋषभ योग्यानें भद्रायुराजावर अनुग्रह करून, त्याला रोगमुक्त केल्याची कथा त्यानें श्रवण करून, गाणगापुरींत स्वामींचे दर्शनास्तव येतांच त्यांच्या दर्शनानें त्याची रोगशांती व पूर्वजन्मस्मरण झालें. नंतर त्यानें स्वामींची प्रार्थना करून त्यांना आपल्या नगरींत आणिलें. तेव्हां तुला ज्ञान होईल असा त्याला त्यांनीं वर देऊन, ते परत गाणगापुरीं आले व सर्व शिष्यांना पाचारण करून ' कलियुगाचे मानाप्रमाणें बहुतेक सर्व म्लेंच्छ राष्ट्रें झालीं, आतां यवनही दर्शनास येतील करितां आह्मीं येथेंच गुप्त राहून प्रसिद्धपणें श्री पर्वतयात्रेकारितां जातों, तुह्मीं दुःख करूं नका. ' असें सांगून पर्वतीं गेले व शिष्यांकडून पुष्पासन करविलें. नंतर गंगेंत आसनावर बसून आह्मीं निजधामास जातों व पुढें प्रसादपुष्पें येतील तीं तुह्मीं ग्रहण करावीं, असें सांगून आपण गुप्त झाले.

ही सर्व कथा स्वतः श्रीगुरूनीं सिद्धरूपानें नामधारक शिष्यास सांगून, ' ज्याप्रमाणें तुझें कथाश्रवणानें दुःख व दरिद्र गेलें तसेंच जे भक्तिपुरस्सर हें गुरुचरित्र श्रवण-पठण-लेखन व रक्षण करतील त्यांचे सर्व इष्ट हेतु

सिद्धीस जातील असें वरदान ह्या पूज्य ग्रंथास दिलें. सारांश, गुरुदैवतासारखें अन्य दैवत नाहीं; असें समजून प्रत्येकानें आपल्यास गुरु करून घेऊन त्याची सेवा करून आपलें इहलोकींचें कर्तव्य बजावावें इतकेंच.

# श्री शुकचरित्र.

श्लोक.

जीतेंद्रियपणें भवाब्धि तरुनी रंभेसि धिक्कारुनी ।
ज्ञानीं लोलपणें पित्यासि हिणवी स्वाधीन कर्में तिन्हीं ॥
भक्तीज्ञान विराग योग मिळवी पाळूनि जन्मारभीं ।
दैत्यांचा गुरु साध्य ज्या संजिवनी विद्याबळें देवभी ॥

भारत, भागवत आणि अठरा पुराणांचा व उत्तरमीमांसेचा कर्ता जो कृष्णद्वैपायनमुनी, तोच ह्या चरित्रनायकाचा जनक. हा गर्भांत असतां भवपाशाच्या भयानें सबंध द्वादश वर्षे जननीच्या गर्भांतच राहिला. व गर्भांतून मुक्त होतांच ह्यानें तडक तपोवनाचा रस्ता धरला. स्वतः बाप जरी इतका ज्ञानी होता, तरी पुत्रवियोगानें विव्हळ होऊन तो त्याच्या पाठीस लागला. शुक पुढें व व्यास मागें असा बराच मार्ग क्रमण केल्यावर, शुकानें पित्यास ज्ञात असलेल्या

अपरोक्ष ज्ञानाची स्मृति देऊन परत फिरविलें. नंतर तपोवनांत जाऊन योगाभ्यास करून ब्रह्मीं लीन होऊन तपश्चर्येस आरंभ करिता झाला.

ह्याप्रमाणें फार दिवस तपश्चर्या केल्यानें इंद्रास आपले पदाची भीति उत्पन्न झाली. पहा महत्पदास किती काळजी? कोणी थोडेसें तपाचरण केलें कीं इंद्राचे अंगावर शहारे आलेच ह्मणून समजावें. त्यानें रंभानांवच्या अप्सरेस बोलावून तिला शुक्राचार्यांच्या तपाचा भंग करण्याबद्दल आज्ञा केली. तिनें ती मान्य करून, आपल्याबरोबर वसंत व मदन ह्यांस घेऊन तपोवनांत गमन केलें. वसंतानें सर्व उपवन शृंगारून मदनानें शुक्राचार्यांचे शरीरांत प्रवेश केला. व रंभेनें नृत्य, गायन आदिकरून शृंगारचेष्टा करण्यास सुरवात केली. मदनानें जंग जंग पछाडलें, रंभा आपल्या करामतीनें अनंगरसाविर्भावाचा थयथयाट करून थकली, पण श्री शुक्रयोगी ध्यानापासून काडीभर देखील ढळला नाहीं. अखेर अंतर्ज्ञानानें रंभा आली आहे असें जाणून ध्यान विसर्जन करून क्षणैक देहेंद्रियावर येऊन त्यांनी रंभेस तेथें येण्याचें कारण विचारतांच, तिनें शृंगारप्रचुरीत हावभावानें मी आपणासारख्या तपोधनास घटकाभर विश्रांति देण्यास्तव आलें आहें, तर क्षणभर तपश्चर्येपासून विमूख होऊन माझ्यासारख्या सुस्वरूप व नाजूक स्वर्गस्त्रीच्या अंगसंगाचा अनुभव घेऊन कृतकृत्य व्हा. मनुष्यानें जन्मास येऊन विषयसुखाची गोडी न घेतल्यास, आह्मांसारख्या नवयुवतीरूप गुलाबाच्या फुलांची स्थिति निर्जन अरण्यांत उगवणाऱ्या व तेथेंच फुलणाऱ्या खरोखर गुलाबाचे फुलांसारखी, व्यर्थ होणार आहे. पुरुषानें जर स्त्रीसंगाचा त्याग करून कोरडी उठाठेव केली, तर त्यापासून ईश्वर सृष्टीक्रमाचा लय नाहीं का होत? ह्या सृष्टींतील प्रत्येक वस्तु मनुष्यप्राण्याच्या उपभोगार्थच ईश्वरानें निर्माण केली असल्यामुळे तिचा उपभोग घेण्याचा जीवमान प्राण्यास एक प्रकारचा हक्कच आहे. तो हक्क न बजावणें ह्मणजे ईश्वराच्या घरीं अन्यायी होणें नव्हे काय? प्रत्यक्ष आपले तीर्थरूप ज्ञानाचे केवळ आगर असतां, त्यांनीं विवाह कां केला? ह्याचें कारण त्यांना गृहस्थाश्रमाची महती ज्ञात असणें

हेंच नव्हे काय? मनुष्य जन्मास आल्यापासून पंचत्वास मिळेपर्यंत देवतांचा व मातापितरांचा ऋणी असत नाहीं काय? आपण तपश्चर्येनें देवांच्या ऋणांतून तर मुक्त झालांत, पण संतती झाल्यावांचून पितरांचे ऋणांतून मुक्त होण्यास आपली तपश्चर्या कशी उपयोगी पडणार? सर्व कर्मांचा नाश झाल्याविना सन्यासाश्रम ह्मणविला जाण्यास आधार कोणचा? स्वर्गद्वारचा रस्ता बंद झाल्यानें, कित्येक तपोनिधी, अल्पकालांत संततीदायक होणाऱ्या पशुपक्षादिक योनींतील स्त्री जातीशीं रममाण होऊन पितरांचें ऋण फेडून, नंतरच स्वर्गवासी झाले ना? मी आपली स्त्री होण्यास तयार असतां असल्या अनुपम्य रत्नाचा त्याग करणारा खचितच दुर्भागी समजला पाहिजे माझ्या ह्या पोंवळ्यासारख्या अधरोष्ठाचें पान, चक्रवाक पक्षांचे युग्माप्रमाणें स्निग्ध व उत्तंग उरोजाचें मर्दन, कमलासारख्या हातांची मिठी, कर्दलीस्तंभासारख्या मांड्यांचा दाब इत्यादि गोष्टी प्रत्यक्ष अमरेंद्रासही आमच्या खुषीखेरीज प्राप्त होणार नाहींत. मी स्वतः अबला असल्यानें जास्त कांहीं बोलूं शकत नाहीं. आपण स्वतः ज्ञानी असल्यानें, सर्व परोक्ष व अपरोक्ष मार्गांची महती जाणताच अहां.

ह्या प्रमाणें रंभेचें अलंकारिक व सप्रमाण भाषण ऐकून, श्रीशुकानें न डगमगतां तावडतोब तिला सांगितलें कीं, तूं ह्मणतेस त्याप्रमाणें पितरांच्या ऋणांतून मुक्त होण्यास, किंवा तिलांजली देण्यास गृहस्थाश्रमधर्म संपादन करणें उक्त कोणास? तर ज्याला चौऱ्यांशींच्या फेऱ्यांत वारंवार पडून, संसाराची गोडी मरेपर्यंत सुटत नाहीं त्यांना. आमच्यासारख्या विरागयांना जर जननमरणाची किंवा नश्वर सुखाची इच्छाच नाहीं, तर गृहसौख्याची काय पर्वा आहे? शिवाय रतिसौख्याचें महत्व विषयी जनांस, आह्मांस नाहीं. ह्याला उदाहरण दूध ह्याला मृत्युलोकची अमृत संजीवनीच समजावयाची, पण ती फक्त आरोग्यास. विषमज्वरास किंवा सन्निपात्यास तेच विषवत मारक होय. तुझ्या शरीरावयवाची तूं तारीफ करतेस पण माझ्या दृष्टीनें त्यांत कांहींच महत्व नाहीं. स्त्रियांच्या अधर-

पानानें तृषिताची तहान भागल्याचें मी आजपर्यंत ऐकिलें नाहीं. कुचकलश केवळ मांसगोळ्यानें बनलेले, मांड्याही मांसल असल्यानें मऊशा वाटतात इतकेंच, जननेंद्रिय तर मूत्र-पुरिषोत्सर्गाचें द्वार, व कृमिकीटकांचें वसतीस्थानच होय. अशांच्या सेवनानें कायतो विषयी जनच भाळला जातो, साधूस त्याचा विधिनिषेधच वाटत नाहीं. माझ्या पित्यानें वेदमार्गाविरुद्ध स्वतःचें लग्न लावण्याचें कारण एकतर महाजन ज्या मार्गाचा अवलंब करितात, तोच रस्ता अज्ञ जन स्वीकारतात व दुसरे संचित क्रीयमाणाचा क्षय, त्याच्या उपभोगाखेरीज होत नसल्यानें, साधूंना जबरदस्तीनें विषयांत मग्न व्हावें लागतें. पण ते त्यांत गुरफटून मात्र जात नाहींत.

ह्याप्रमाणें सर्व प्रश्नांचा निवाडा सोपपत्तिक प्रकारानें श्रीशुकानीं केल्यामुळें, व आपल्या इंद्रियांची आणि शरीरावयवांची त्यानें निंदा केलेली तिला असह्य होऊन, आपली मात्रा ह्याजवर लागू पडत नाहीं असें पाहून रंभेनें श्रीशुकास आपलें उदर आपल्या हातांनीं उघडें करून, त्यांत केशर, कस्तुरी इत्यादि सौगंधिक द्रव्यें परिपूर्ण भरलेलीं असून त्यांचा घमघम सुवास सुटला आहे, कृमी कीटकांचें त्यांत नांव देखील नाहीं, असें दाखवितांच श्रीशुकानें खेदोद्गार काढून मला जर असें माहित असतें तर मी आपल्या जननीच्या अमंगल उदरांत बारा वर्षे लोळत न पडतां, तुझ्याच उदरांत जन्म घेतला असता असें ह्मटलें. इतके श्रीशुकाचे तोंडांतून शब्द निघतांच रंभेनें धांवत जाऊन श्रीशुकाचे पाय धरले, व तूं मात्र खरोखर मदनासारख्या प्रबळ व अवध्य शत्रूस जिंकून त्याला आपल्या कह्यांत ठेवलेंस, आतां मी आपला निरोप घेतें असें ह्मणून ती स्वर्गास चालती झाली. व इंद्रसभेंत येऊन श्रीशुकाच्या जितेंद्रियपणाची वाखाणणी करून तो इंद्रपदप्राप्त्यर्थ तप करीत नसून स्वदेहाचें सार्थक समजूनच तें तो करीत आहे असें सांगून, त्यास निर्भय केलें. तपश्चर्या संपूर्ण झाल्यावर दैत्यांनीं आपलें पुरोहितपण शुकास दिलें. बळीच्या हस्तें नव्याण्णव अश्वमेध नर्मदातटाकीं करवून शंभराव्या यज्ञास आरंभ करविला असतां इंद्राचें अवन करण्यास्तव

श्रीविष्णूनीं वामनावतार धारण केला व बटुवेषानें त्याच्या संकल्पित हेतूचा भंग करण्यास्तव नर्मदा तीरीं येऊन त्याची अर्घ्यपूजा ग्राह्य करून, आपल्या पायानें त्रिपाद् भूमीदान मिळण्याची विनंति करितांच बलीनें त्याचें कापट्यरूप न ओळखल्यानें रुकार दिला. श्रीशुकानें त्या कपटी ब्राह्मणाचा दुष्ट हेतु बळीस स्पष्ट करून सांगितला असतांही त्यानें त्याकडे लक्ष न देतां आपलें वचन खरें करण्यास्तव त्याचे हातावर संकल्पित उदक घालण्यासाठीं पाण्याची झारी घेऊन तिनें पाणी सोडीत असतां श्रीशुकानें आपल्या यजमानाच्या हितास्तव खड्याचें रूप घेऊन त्या जलपात्राच्या तोंडावर बसून पाण्याची धारच बंद पाडली. वामनानें दर्भाच्या काडीनें तो खडा मागें सारतांच शुक्राचार्याचा एक डोळा फुटून त्याचा अटकाव नाहींसा झाला. नंतर उदक हातावर घेऊन दोन पावलांतच स्वर्ग व मृत्युलोक व्यापून तिसरा पाय ठेवण्यास आधार नसल्यानें तो त्या उदार राजाचे मस्तकावर ठेवून त्याला पाताळांत दडपून तेथचें राज्य त्याला समर्पण करून त्याला चिरंजीव करून त्याच्या वचनास्तव आपण स्वतः त्याच्या द्वाररक्षकाचें नीच कर्म श्री भगवंतानीं पत्कारिलें.

वृषपर्वा दानवांचा राजा असतां, श्रीशुक आपली कन्या देवयानी, इच्यासह, त्याच्या नगरींत राहत असतां, देवांनीं आपला गुरू जो बृहस्पति ह्याच्या विचारानें गुरुपुत्र कच ह्यास शुकापासून संजीवनी विद्या प्राप्त करून घेण्यास्तव, पाठविलें. कारण ती विद्या देवगुरूस अवगत नसल्यानें, राक्षसांचा पक्ष नेहमीं त्यांच्या गुरूच्या विद्याबळावर जोरावला जाई. कचानें शुक्राचार्यास सेवेनें संतुष्ट केलें, पण विद्यादान मिळण्याची संधीच सांपडेना, कारण गुरूसभोंवार राक्षसांच गराडा पडलेला व कचाचे आगमनानें तर त्यांच्या मनांत जास्तच संशय येऊन ते गुरूस क्षणभरही त्याच्याशीं एकदा बोलूं देईनात. देवयानी उपवर झाली असल्यानें, तिचें मन कचावर बसून, ती त्याज वर जिवापेक्षां जास्त ममता करीत असे. दैत्यांनीं हा कपटी बटु कधींना कधीं तरी आपणास ठकवून शुकापासून संजीवनी विद्या उपटील अशा भीतीनें, ती भीतीच निर्मूल करण्याचें योजिलें. कच दररोज

प्रातःकाळीं गाय चारण्यास अरण्यांत जाई, तो सायंकाळीं परत घरीं येई. हें त्यांना ठाऊक असल्यानें त्यांनीं एके दिवशीं अरण्यांत त्याचा प्राण घेतला.

त्या दिवशीं अस्तमानीं कच अर्थातच घरीं परत आला नाहीं ह्मणून देवयानीनें त्याच्या वियोगामुळें अन्नपाणी वर्ज केलें. शुकानें ज्ञानदृष्टीनें कचाचा घात दुष्ट दैत्यांचे हातून झालेला समजून संजीवनीमंत्रानें त्याला सुखरूप घरीं आणिलें. हें जाणून दैत्यांनीं दुसऱ्या वेळीं त्याचा घात करून त्याच्या शरीराची रक्षा मद्यांत मिळवून तें मद्य श्रीशुकास पिण्यास दिलें. देवयानीनें फिरून हट्ट घेतला, तेव्हां खरी हकिकत तिला कळवून मी किंवा कच कोणीतरी एक तुला मिळेल, असें तिला त्यांनीं सांगितलें. तिनें दोघेही असावेत असें ह्मणतांच, शुकानें प्रथम त्याला जठरांत सजीव करून नंतर त्याला सजीवनीमंत्राचा उपदेश केला. व कुक्षीभेद करून बाहेर यावयास आज्ञा करितांच, तो बाहेर येऊन प्राप्तविद्येनें गुरूस सजीव करिताझाला. नंतर इष्टवस्तु साध्य झाल्यानें त्यानें परत स्वगृहीं जाण्याची गुरूपाशीं आज्ञा मागितली देवयानीनें त्याला आपला अंगिकार करण्याबद्दल अतोनात गळ घातली; तेव्हां एकतर तूं गुरु-भगिनी, व तूं आणि मी एकाच उदरांत निर्माण झालों असल्यानें सहोदरपणाचें नातें होतें. तेव्हां असा अनाचार माझ्या हातून कधींही घडणें नाहीं. असा त्यानें तिचा निषेध करतांच, तूं कृतघ्न आहेस, केवळ माझ्याच आग्रहास्तव माझ्या पित्यानें तुला द्विवार सजीव केला व ह्मणूनच तुला अलभ्य वस्तु प्राप्त झाली. आतां तूं माझा मनोभंग करतोस तर तुझी विद्या निष्फळ होईल असा माझा शाप घे. ह्मणून सांगितलें.

त्यानेंही माझा अन्याय नसतां केवळ स्वहितास्तव मला विनाकारण शाप दिलास, त्या अर्थी तूं द्विजकन्या असूनही तुला क्षत्रिय पति मिळेल असा मी शाप देतों. मी ही विद्या दुसऱ्यास सांगून कार्य भाग घडवीन पण तुझ्या जन्मादारभ्य द्विजत्वाची मात्र आमरण माती झाली, असें समज. असा उभयतांचा संवाद होऊन दोघेही चालतीं झालीं. कचानें ती विद्या गुरूस शिकविली व देवयानीचा ययाती राजानें अंगिकार

केला. शुकानें जो ब्राह्मण आजपासून असलें अनर्थावह सुरापान करील त्याचें ब्रह्मत्व लय पावेल असा वारुणीस शाप दिला. सारांश जीतेंद्रियत्व सहजीं साध्य होणारें नव्हे, व मदनास जिंकणारा पुरुषकोटीमध्यें देखील क्वचित एखादाच सांपडेल हें खरें.

# दुर्वास चरित्र.



ज्याचा होत असे अतीशय अशा सद्गुण ना वोलिजे ॥
होतो घातक तो भल्या मुनिसही कालावकाशें खुजे ॥
क्रोधाचा पुतळा महा छळकही दुर्वास होता जनीं ॥
त्यातें होय अती भयंकर सजा त्याच्या अकोपावनीं । १ ।

प्रख्यात अत्री ऋषि व सुप्रसिद्ध साध्वी अनुसूया हींच सदर चरित्रनायकाचीं मातापितरें. रुद्राच्या अंशानें ह्याचें जनन असल्यानें त्यांचेसारखाच हा परम कोपिष्ट, त्याचप्रमाणें दृढ छळवादी, महान तपश्चर्या करणारा,

इतकें असून ह्याला आपली तपश्चर्या ह्यानें जो साधूंचा छळ केला त्या पापाच्या निरसनार्थ भरीस घालावी लागली. हा, दुर्योधन व दुःशासन हे कलीच्या राशीवरच जन्मास आलेले होते. ह्यानें जे कित्येक साधूंचे विनाकारण छळ केले, त्यांपैकीं परम विष्णुभक्त अशा अंबरीष राजाच्या छळानें, ह्याला आपल्या कोपाचें चांगलेंच प्रायश्चित्त मिळालें. ती कथा अशीः—अंबरीष राजाचा असा नियम असे कीं, प्रत्येक एकादशीचें पारणें साधन द्वादशी संपण्यापूर्वी करावयाचें. एका द्वादशीस ह्या माहा ऋषींची स्वारी त्या राजाचे घरीं आली. राजानें पूजा वगैरे करून, भोजनास उठण्याची विनंति केली. तेव्हां मी आतां स्नान करून आलोंच, असें राजास सांगून त्याचें सत्व पाहाण्यासाठींच मुद्दाम स्नानसंध्या फार लांबविली. राजा फार वेळ तिष्ठत बसला. परंतु ऋषि द्वादशी संपण्यापूर्वी येत नाहीं असें पाहून आपला व्रतभंग न होण्यास्तव श्रीविष्णूचें तीर्थ व एक तुळशीपत्र घेऊन त्यानें एकादशी सोडली व ह्याची वाट पाहत स्वस्थ बसला.

ही गोष्ट अंतरज्ञानानें दुर्वासमुनीस कळतांच ही संधि राजास सत्यापासून च्युत करण्यास चांगली आली आहे, ह्मणून आनंद मानून राजवाड्यांत आला. राजास अतोनात दुरुत्तरें बोलून तूं ब्राह्मणांचा फार चांगला अपमान करतोस तर ह्याचें प्रायश्चित्त घे, असें ह्मणून जटेंतील एक केश काढून त्याची सिद्धीच्या जोरानें एक भयंकर कृत्या उत्पन्न करून तिला राजावर सोडली. राजा हा विष्णूचा अत्यंत प्रिय भक्त असल्यानें विष्णूनें आपलें सुदर्शनचक्र त्याच्या रक्षणार्थ अहोरात्र ठेविलें होतें. त्यानें त्या कृत्येचा

संहार करून मुनीचा पाठलाग केला. आतां कोणास शरण जावें ह्मणून विचार करीत दुर्वास पळत पळत ब्रह्मलोकीं गेले. तेथें विधात्यांस साष्टांग नमस्कार घालून आपली हकीगत कळवितात तोंच सुदर्शन केवळ अग्नीच्या लोळाप्रमाणें धगधगणारें तेथें येऊन ठेपलें व माझा भक्ष मला दे नाहींपेक्षां सर्व सत्यलोक तुझ्यासह भस्म करतों अशी त्यानें ब्रह्मदेवास दहशत घालतांच त्यानें आपल्या कानांवर हात ठेवले. तेथून ऋषि कैलासास आले. शंकराची प्रार्थना करून त्यालाही विष्णुचक्रापासून संरक्षण करण्याची विनंति केली. पण त्यानें नाखुषी दाखवितांच अखेरचा साह्यकर्ता वैकुंठनाथ अशा आशेनें वैकुंठाचा रस्ता धरला. पुढें दुर्वासमुनी धांवताहेत, भयानें व पळण्याच्या श्रमानें अंगांतून घामाचे पूर वाहाताहेत, धोतर गळून पडण्याची पाळी आली आहे, दम लागून श्वासोच्छ्वास करणें मुष्कील झालें आहे, मागें फिरून सुदर्शन किती लांब आहे ह्मणून पहावें तर धैर्य नाहीं अशा थाटानें त्यांनीं एकदाचें वैकुंठ गांठलें. विष्णुपुढें दंडामारखे पडून भयातीचें रक्षण करण्याबद्दल प्रार्थना केली. पण त्यानेंही ना रुकार देऊन 'ह्या भयापासून तुझें त्राण करण्यास फक्त काय तो एकटा अंबरीषच समर्थ आहे. हें जरी माझें आयुध आहे तरी सांप्रत त्याजवर मालकी राजाची असल्यानें तें सर्वस्वी त्याच्या कह्यांत आहे.' असें सांगितलें.

असा उभयतांचा संवाद चालला आहे तोंच सुदर्शन येऊन थडकलें. व बऱ्या बोलानें माझा भक्ष माझे स्वाधीन करा, जर त्याला पाठीशीं घालाल तर वैकुंठासुद्धां आपण

भस्म व्हाल अशी तंबी त्यानें विष्णूस दिल्यावर बिचारा दुर्वास नाक मुठींत धरून परत अंबरीष राजाचे घरीं आला. इतकें कृत्य घडण्यास संपूर्ण द्वादश मास लोटले तोंपर्यंत राजा निराहारी असून फक्त जलपानावर त्यानें देह धारण केला होता. दुर्वास मुनीस पाहतांच राजास प्रेमाचें भरतें आलें व अष्टभाव दाटून येऊन आतां तो दुर्वासास नमन करणार इतक्यांत मुनीनेंच त्याला सिरसाष्टांग वंदन केलें, व 'विष्णुभक्ताचा छळ केल्याबद्दल यथायोग्य खरपूस बक्षीस मिळालें, आतां तरी ह्या अरिष्टापासून माझें रक्षण कर आणि ब्रह्महत्येच्या दोषापासून मुक्त हो.' असें विनयानें मागणें मागितलें. राजानें तत्काळ ऋषीस उचलून घेऊन सुदर्शनास आपल्या स्थानीं जाण्यास सांगितलें. तेव्हां ते ह्मणाले 'हे परोपकारी राजा, ह्या असल्या नाहक छळ करणाऱ्याला जगांतून निर्मूल करूं दे ह्मणजे इतरांस ह्यापासून पीडा व्हावयाची नाहीं' अशी विनंति केली. पण राजानें निक्षून सांगितल्यावर त्यानें निरुपायानें आपल्या ठिकाणीं गमन केलें नंतर दुर्वास ऋषीस पंक्तीस घेऊन राजानें सावकाशपणें द्वादशी सांग केली. व दुर्वासही आज दैवानेंच खैर केल्यानें आपण बचावलों ह्मणून आनंद मानून मार्गस्थ झाला. व मनांत फिरून असा कोणाचा छळ करावयाचा नाहीं, ह्मणून संकल्प करून तपश्चर्येस चालता झाला. "कुत्र्याचें शेपूट नळकंड्यांत घालून ठेवलें तरी तें वांकडेंचे वांकडेंच" अशी जी ह्मण आहे ती कांहीं खोटी नव्हे!

दुर्वासांनीं कांहीं दिवस तपश्चर्या केल्यावर फिरून त्यांना पृथ्वीप्रदक्षिणेची इच्छा उत्पन्न होऊन ते कुंतीच्या

बापाच्या घरीं आले. उद्देश हाच कीं, छळवाद करून त्याला पाडाव करावें. राजानें कुंतीसच त्यांच्या शुश्रुषेस दिली. हा इतका अग्या वेताळ, पण कुंतीनें तिळमात्र त्याच्या सेवेंत कमतरता येऊं न दिल्यानें स्वारी प्रसन्न होऊन तिला पांच मंत्र न्यासासुद्धां सांगितले. व ह्या एकेका मंत्राचें शुचिर्भुतपणानें पठण करशील तर तो तो देव प्रत्यक्ष येऊन तुझा मनसंकल्पित हेतु पुरा करील असें सांगून, व राजास आसीर्वाद देऊन ते फिरून तपश्चर्येस चालते झाले. "मेल्यावांचून जित्याची खोड जाणें नाहीं" ह्याप्रमाणें फिरून पांडव वनवासांत असतां, हे महाराज हस्तिनापुरांत राजा दुर्योधनाकडे आले. त्यांनेंही कुंती-प्रमाणेंच यथायोग्य सरबराई ठेवून, डोळ्यांत तेल घालून एकसारखी सहा महिनेपर्यंत निश्चयानें सांग सेवा केल्यामुळें प्रसन्न होऊन, इच्छित वर माग ह्मणून त्यांनीं राजास आज्ञा केली.

दुर्योधनानें पांडवांस प्राप्त झालेल्या सूर्यदत्त स्थाली-पासून, केव्हांपासून केव्हांपर्यंत पाक उत्पन्न होतो तें सांगून रात्रीच्या वेळीं आपण तेथें जाऊन धर्मापाशीं भोजन मागा, मिळाल्यास उत्तमच नाहींपेक्षां शाप देऊन सर्वांना भस्म करा, ह्मणजे माझा कांटाच उपटल्यासा होऊन मी आमरणपर्यंत निष्कंटक राज्योपभोग घेईन असें मागणें मागितलें. त्यांनींही पुढचामागचा कांहींएक विचार न करितां 'ठीक आहे' असें ह्मणून, बरोबर साठ सहस्र शिष्यांची मांदी घेऊन, मध्यरात्रीं धर्माचे पर्णकुटींत आले व 'क्षुधा फार लागली आहे, भोजन दे; नाहींतर शाप घेऊन बंधु व पत्नीसह भस्म होण्यास तयार हो' असें सांगितलें.

धर्म विचारांत पडला. कारण एक वेळ याज्ञसेनी जेवून थाली पालथी घातल्यावर सूर्योदयाखेरीज तिच्यांत एक शीतही मिळणें नाहीं. इकडे दुर्वासाचाच फक्त आहार साठ खंडींचा शिवाय साठ हजार ऋषि बरोबर! आतां काय करावें? ह्मणून त्यानें द्रौपदीच्या तोंडाकडे पाहिलें. तिनें माननेंच ऋषींस स्नानास जावयास सुचवावें असा संकेत दाखवून, लगेच तुळशीच्या वृंदावनापाशीं आली व आपला संकटहर्ता भाऊ जो श्रीकृष्ण द्वारकाधीश त्याचा संकटपरिहारार्थ धांवा आरंभिला.

दुर्वासानें आमच्या संध्या वगैरे आटोपल्या असून, इकडे येतां येतां अपरात्र झाली, ह्मणून फक्त स्नानें करून आह्मीं आतांच येतों, पात्रांची सिद्धता असली पाहिजे, असें धर्मास हडसून खडसून सांगितलें. कृष्ण ह्या वेळीं आपल्या पट्टराणीच्या ह्मणजे रुक्मिणीच्या विलास-मंदिरांत जेवावयास बसून नुकतें कोठें दोन घांसच त्याच्या पोटांत गेले होते, इतक्यांत द्रौपदीचे आर्तस्वर कानांवर येऊन आदळले. मग कसलें जेवण व कसले विलास? पुढचें भरलेलें ताट तसेंच ढकलून हांत धुतले व गरुडाची वाट न पाहतां, एकीकडे केश विखुरलेच आहेत, डोईस मुगूट नाहीं, पितांबराचे सोगे भूईवर लोळताहेतच अशा धांदलीनें स्वारी जी निघाली ती थेट द्रौपदीपाशीं वृंदावना-पुढें येऊन उभी राहिली. व हे भगिनी मी जेवत असतांना अर्धे जेवण टाकून तसाच तुझ्यासाठीं येथवर पायींच पळत आलों, ह्मणून आधीं मला कांहीं तरी खावयास दे, ह्मणून बोलूं लागली. दरिद्यापाशीं याचक जावा त्या प्रमाणेंच कृष्णाचें हें भाषण ऐकून द्रौपदी हांसून ह्मणाली, अरे

कृष्णा, ह्या वेळीं घरांत एक कणही खावयास नसल्यानें ऋषींस भोजनार्थ अन्न तयार करण्यासाठीं मी मुद्दाम तुझा धांवा केला, तो तूंच खाण्यासाठीं माझें सत्व घेऊं पाहातोस तेव्हां तुला काय ह्मणावें? कृष्णानें उत्तर केलें कीं ती कांहीं सोय नाहीं. आधीं मला जेवूं घाल ह्मणजे असले कोट्यावधि दुर्वास मी अन्नाच्या पर्वतांत बुडवून टाकतों. जा. एक वेळ तुझी ती कामधेनूप्रमाणें इच्छित अन्न प्रसवणारी स्थाली इकडे घेऊन तर ये. कृष्णा ह्मणाली, तुला वेड तर लागलें नाहीं ना? अरे एक वेळ मी जेवून ती पालथी घातल्यावर दुसरे दिवशीं सूर्योदयापर्यंत त्यांत एक भाजीचा देंठ सुद्धां उत्पन्न होत नाहीं, असें असून तूं असा भलताच हट्ट धरून बसल्यास कसें होणार? ऋषि स्नान करून परत येण्याची वेळा झाली, त्यांची आधीं तरतुद लाव व मग तूं स्वस्थ असाच विनोद करीत बैस.

कृष्ण कांहीं केल्या आपला हट्ट सोडीना. म्हणून द्रौपदीनें अखेर त्याच्या मसजुतीस्तव घरांतून स्थाली आणून त्याच्यापुढें ठेवली व हें लांकूड पाहिजे तर खा असें रागानें त्याला सांगितलें. कृष्णानें कृष्णेचा राग विनोदापरी समजून ती स्थाली आंतून बाहेरून निरखून पाहिली तों एक भाजीचें पान तिच्या कांठास चिकटलेलें त्याला सांपडलें. तें पाहतांच पंचपक्वान्न मिळाल्याचा आनंद मानून तें भक्षण करून ढेंकर दिली व सर्व त्रिभुवन धालें असें ह्मणून, ज्या नदीवर ऋषि स्नानें करीत होते तिच्याच कांठीं भव्य धर्मशाळा, पांच पांडव, द्रौपदी वगैरे मायेनें उत्पन्न करून त्यांना आकंठ भोजन देवविलें. इकडे धर्मानें ब्राह्मणांस उशीर लागला, ह्मणून नकुलास पाचारण

पाठविलें. तो पाहातो तों सर्व ब्राह्मण यथेच्छ तृप्त होऊन वामकुक्षी करिताहेत! नकुळानें धर्माचा निरोप दुर्वासास कळवितांच आह्मीं तृप्त झालों, तुझा आपत्काल संपून तुझे शत्रूंचा लवकरच शेवट होईल, असा आशीर्वाद देऊन खजीलपणें शिष्यांसह तपश्चर्येस चालते झाले. सारांश, ' अतां तेथें माती ' हेंच खरें.

## श्री विदुरचरित्र.



॥ कर्तव्यें छळतां ऋषीस उतरे भूमी वरी तत्वता ॥
॥ अन्यायास्तव शूद्रयोनि ऋषिच्या वीर्यें मिळे जन्मता ॥
॥ ज्ञाता भूत भविष्य सांप्रत अशा वेळोस होई मही ॥
॥ होता कृष्ण सखा तसा अवनिही पंडुसुतांच्यातही १ ॥

एके समयीं राजाच्या घरीं चोरी करून, चोरांनीं तें

धन अरण्यांत विभांडक नांवाच्या तपोधनाचे आसनाखा-
लीं पुरून ठेवून. ते पलायन करीत असतां, राजसेवकांनीं
त्यांना दुरून पाहिलें. तेव्हां हा ऋषि
ढोंगी असून, चोरांचा साथीदार होय, अशा दृढ
समजूतीनें, त्यांनीं त्याला चतुर्भुज करून, ताडण करीत
राजापाशीं आणिलें व एकंदर सर्व हकीकत तिखटमीठ
लावून राजास कळवितांच त्यानेंही विचार न करितां
त्या तपोधनास एकदम सुळावर देण्याची आज्ञा केली.
राजाज्ञेप्रमाणे सेवकांनीं त्याला सुळावर चढविला.
त्या दुस्तर शूळयातना अनुभवीत असतां, एक पतिव्र-
ता स्त्री आपल्या पतीस पाठीशीं बांधून त्या मार्गानें चा-
लली होती. तिचा नकळत धक्का ह्या ऋषीस बसून
त्याचे पंचप्राण व्याकूळ झाले. व पंचत्वास पावतां पा-
वतां 'ज्या दुष्टेनें मला धक्का लावला ती सूर्योदयाबरोबर
विधवा होईल.' असा शाप त्यानें त्या स्त्रियेस दिला
तिनेंही आपल्या पातिव्रत्याच्या जोरावर सूर्य उगवणेंच
बंद पाडलें. त्याबरोबर सर्व जगतांत तमाचें साम्राज्य
माजून वेदविहित यज्ञ-यागादि कर्में बंद पडलीं, व त्यामुळें
देवता क्षीणबल होऊं लागून मृत्युलोकीं सर्वांनाच उ-
पाशीं मरण्याची पाळी आली. कारण, सूर्योदयच होत
नसल्यानें कोणास चरितार्थाचा कामधंदा करितां येईना.
वनस्पतींची वाढ खुंटली. उष्णतेच्या अभावानें रोगांचा
प्रादुर्भाव सुरू झाला. व अशा प्रकारें संपूर्ण त्रैलोक्य
हैराण झालें. असें होण्याचें कारण कोणासच उमजेना.
म्हणून सर्व लोक देवांस शरण गेले. पण तेथेंही तीच रड!
त्यांना बरोबर घेऊन देव विधात्याकडे जातांच त्यानें,
आत्मदृष्टीनें त्या गोष्टीचें मर्म ताडलें. व तो त्या स्त्रिये-
कडे येऊन तिला सर्व लोकांच्या कल्याणास्तव सूर्यास
उदयाचलावर येण्याची परवानगी देण्याबद्दल विनवूं

लागला. तिनें 'जर तुझा ऋषिशाप असत्य करून माझें वैधव्य टाळूं शकाल तरच मी सूर्योदय होऊं देईन' असें सांगितलें. तेव्हां ब्रह्मदेवानें तुझा पति चिरायु होईल, असा तिला वर देतांच तिनें आपल्या ओंजळींत घेतलेल्या संकल्पित पाण्याचा त्याग पृथ्वीवर करतांच भगवान सहस्ररश्मी उदयाचलावर आला, व सृष्टीचें राहाटगाडगें सुयंत्र चालू झालें.

इकडे त्या विभांडकाचा आत्मा, यमपुरीस नेऊन स्वतः यमधर्म त्याच्या पाप-पुण्याचा निवाडा चित्रगुप्ताच्या मदतीनें करीत असतां, बालपणीं एका माशीस काडीनें टोंचल्याचे क्षुल्लक दोषास्तव शूलारोपणासारखी कडक शिक्षा भोगण्याचा खडतर प्रसंग आपणावर आला असें समजून त्यांनीं यमधर्मास 'तूं ह्या असल्या अल्प अपराधास कठोरतर शिक्षा केल्याबद्दल, मृत्युलोकीं दास्यकुलांत जन्म घे' असा शाप दिला. व आजपासून प्राण्याच्या बाहा वर्षांच्या आंत, त्याच्या हातून घडणाऱ्या स्वल्प दोषांची गणती पापांत होऊं नये असें त्यानें यमधर्मास व चित्रगुप्तास समजावून सांगितलें. असा दुर्धर शाप ऐकतांच, तो प्रत्यक्ष कृतांत असूनही त्याला हा ब्राह्मण आपलाही काळच आहे, असें वाटून त्यानें दीनपणानें ऋषींचे पाय धरून कृतापराधाची क्षमा करून उःशाप देण्याची विनंति करितांच त्यांचें अंतःकरण द्रवलें, व तूं ऋषिवीर्यानें दासी उदरीं जन्म घेऊन त्रिकालज्ञ व कृष्णसखा होशील, व ज्ञाता होऊन जन्मांतीं मृत्यूच्या दरबाराचें आधिपत्य तुला पूर्ववत मिळेल, असें सांगितलें.

पुढें आपत्तिकालीं सत्यवती स्नुषांस व्यास वीर्यदान देत असतां त्याच्या उग्र स्वरूपास भिऊन वडील सुनेनें आपल्या बदला आपली दासी त्यांच्याकडे उपभोगार्थ

[illegible]ावताच, तिनें व्यासास अंगसंगानें तृप्त केलें. त्या कारणानें हा गर्भ दिव्यज्ञानी, महान भगवद्भक्त, व त्रिकालज्ञ होईल; पण केस पांढरे असे सत्यवतीस सांगून द्वैपायन चालते झाले. तोच हा यमधर्मांचा अवतार विदुर रूपानें. कुरु वंशाचे लेकवळ्यांत जन्मला. हा भगवद्भक्त, व कृष्णदास असून धृतराष्ट्रास सल्ला-मसलत देण्यांत प्रमुख असे. ह्यानें धृतराष्ट्रास, दुर्योधन जन्मतांच त्याचा त्याग करून कुरु कुलाचें रक्षण करण्यास सांगितलें. द्युत प्रसंगीं दुर्योधनाचा धिःकार केला. [illegible] त्यांना त्याप्रमाणे अर्ध राज्य देण्यास अंधास सांगितलें. कृष्ण पांडवांच्या तर्फे शिष्टाईस आले असतां, दुर्योधन त्यांचे आपणास मान देईना, म्हणून त्याला बद्ध करून कैदेंत घालण्याबद्दलचीही त्यानें [illegible] त्या सर्वांच्या अनादरच केल्यामुळें त्या उपदेशाचा का[ल्पन]िक उपयोग न होतां, अखेर सर्व कुरुकुलाचा नाश दुर्यो[ध]न पुत्रवात्सल्यानें धृतराष्ट्रानें करून घेतला, व अ[खे]रीत शोकसंतप्त झाला. त्याचे बुद्धीवर विदुराच्या नी[ति]तत्वांच्या, मैत्रेयाच्या व व्यासांच्या ब्रह्मज्ञानाचा कृष्णासारख्यांच्या विश्वरूप दर्शनानें भविष्य-मरण प्रगट झाले असूनही, त्याच्या वचनांचा काडीभर परिणाम न हो[ता] [illegible] दारोदार भटकण्याचा पाळा आली.

कृष्ण शिष्टाईस आल्यावेळीं ह्याच्या घरीं उतरून मोठ्या भक्तीनें ताक-कण्या सेवन करिते झाले. पांडवांस लाक्षागृहांत मारण्याचा दुर्योधनाचा दुष्ट हेतु भविष्यज्ञानानें जाणून ह्यानें पांडव वारणावतींत जाण्यापूर्वी, धर्मराजास गृहांत निर्धास्त संचार न करण्याबद्दलचा हेतु बर्बर भाषेनें कळविला, व खनिकाकडून गुप्त विवर तयार क-

रवून तो मार्ग पांडवांस अवगत करवून त्या योगानें त्यांचें प्राणत्राण करविलें. द्युत न खेळण्याबद्दल धर्मास वारंवार उपदेश केला. पांडव वनवासांत असतां वारंवार त्यांना धीर देऊन व उपदेशाच्या गोष्टी सांगून त्यांचा वनवास तितका सुखकर केला.

कौरवयुद्ध संपल्यावर, दुर्योधनाचा वध झाल्यावर भीष्माचे निधनानंतर व सर्वांच्या उत्तरक्रिया धर्मराजाकडून यथासांग संपादून करून विदुर आपला बंधु धृतराष्ट्र व भावजया गांधारी व कुंती ह्यांना तपोवनांत नेण्याबद्दल धर्मास विचारूं लागला. पण कुंतीस पुत्रांचे सुख-सोहाळे पाहण्याची आतुरता जाणून, व पांडवही त्या गोष्टीस प्रतिकूल आहेत असें जाणून धर्मास गोत्रज वधाबद्दल क्षात्रधर्माप्रमाणें शोकाकुल न होण्याबद्दल व जर तुझे मनास हुरहुर वाटत असेल तर श्रीकृष्णाज्ञेनें तत्शांत्यर्थ अश्वमेध करण्याबद्दल सांगून व गांधारी आणि धृतराष्ट्र ह्यांना बरोबर घेऊन देहाचें सार्थक करण्यास्तव तो तपोवनांत चालता झाला. तेथें तपाचरण करून धृतराष्ट्रास व गांधारीस ऋषींच्या आश्रमांत ठेवून कांहीं दिवस त्यांना पुत्रशोकाची विस्मृती पडेपर्यंत त्यांच्या समागमें राहिला. धर्म त्यांना लागणारी सामुग्री हस्तिनापुरांतून पोहोंचवीत असे, व वारंवार बंधूसह त्यांचे दर्शनास येत असे. असें असतां एके दिवशीं धृतराष्ट्र व गांधारी हीं उभयतां भागीरथीवरून स्नानें करून परत ऋष्याश्रमीं येत असतां त्यांनीं दीक्षा घेतलेल्या अग्निहोत्राच्या कुंडांतील अग्नि एकाएकीं प्रज्वलित झाला व त्यानें वेदिकेची मर्यादा उल्लंघून सर्व आसपासच्या अरण्यास भक्षण करण्यास आरंभ केला. त्या अग्नीनें उभयतां स्त्री-पुरुषें जळून भस्म झालीं. हें वृत्त धर्मराजास हस्तिनापुरांत कळवून त्यांच्या उत्तर-

क्रिया संपादण्यास्तव त्याला तपोवनांत बोलावून आपला पाश अनायासें सुटल्याचा आनंद मानून त्यानें ऋषींच्या अनुज्ञेनें एकांतवास पत्करला.

इकडे धर्म व कुंती पांडवांस घेऊन तपोवनांत आली. धर्मानें उभयतां चुलता व चुलती ह्यांचीं और्ध्वदेहिकें यथासांग संपादन करून नंतर विदुराचे दर्शनास नि- घाले. अरण्यांत धुंडतां धुंडतां एका वृक्षास टेंकून ब्रह्मा- नंदांत निमग्न झालेल्या विदुरास सर्वांनीं सन्मानपूर्वक वंदनें केलीं, कांहीं उपदेशाच्या गोष्टी विदुरमुखानें ऐक- ण्याची धर्मराजास लालसा होतीच; पण तो विदेह- स्थितींत निमग्न असल्यानें व त्याला स्वदेहाचेंच मुळीं स्मरण नसल्यानें सर्वजण हिरमुसले होऊन परत वंदनें करून हस्तिनापुरांत आले. ह्याप्रमाणें ह्या सत्पुरुषाचा अंत झाला. सारांश ज्ञान हें कांहीं वांटलेलें नव्हे. त्याला जाती, वर्ण ह्यांचा भेदाभेद लागत नाहीं; तर तुकारामाचे ह्मणण्याप्रमाणें । येथें तें पाहिजे अस्सल जातीचें । येर गाबाळाचें काम नाहीं ॥ असला अस्सल जातिवंत हिराच पाहिजे. कारण, ब्रह्मपदाची प्राप्ति सहजीं होऊं शकत नाहींच ॥ व्हावे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदीं नाचे । हीच शुद्ध कव्युक्ति खरी.

# श्री इंदु चरित्र.



ज्याच्या उदयापासून सर्व लोकांस आनंद होवून चंद्रविकासिनी कमलिनी प्रफुल्लित होतात, सह्याद्रीकन्येच्या पतीचें हृदय आनंदानें उचंबळूं लागतें, आणि सूर्यतापापासून मुक्त झालेल्या वृक्ष वल्ली पूर्ववत टवटवीत दिसतात, असा जो दिक्पति चंद्रमा याच्या जननासंबंधी विचार करितां दोन मतें प्रदर्शीत करावीं लागतात कारण, मूळस्तंभ ग्रंथांत "मार्गजा"नामक माळिणीस मंदलऋषिपासून झाले-

ची कन्या सोमप्रभा ही कश्यपाच्या छत्तिस राण्यापैकीं तिसरी राणी असून इचेच उदरीं कश्यपवीर्यानें चंद्राची उत्पत्ति झाली, अशी माहिती मिळते. परंतु "काशीखंड" नामक ग्रंथाकडे लक्ष दिलें तर चंद्राची उत्पत्ति अत्रिवीर्यापासून झाली असें दिसून येतें. कारण, एके वेळीं महासती अनुसूया हिचा पती जो विरंचिदेवाचा पुत्र अत्रि ऋषि हा काशी क्षेत्रांत तपश्चर्या करीत असतां त्याचें वीर्य ऊर्ध्वपंथें जाऊन त नेत्रद्वारें भूमीवर पडलें. तेव्हां स्वर्गलोकांहून ब्रह्मदेव येऊन त्यांनीं तो गर्भगोळा उचलून घेतला; व आशिर्वचन देऊन त्याचें "चंद्रमा" असें नांव ठेविल्यावर त्याला आपणाबरोबर स्वर्गलोकीं नेलें.

कांहीं दिवसांनीं आपण तपश्चर्या करावी असें चंद्रास वाटतांच त्यानें ब्रह्मदेवाची आज्ञा घेऊन काशी क्षेत्रांत आगमन केलें. तेथें आल्यावर त्यानें अर्ध कल्प पावेतों उग्र तपश्चर्या करून नंतर यज्ञायज्ञास सुरुवात केली. यज्ञसमारंभास सावित्रीसह ब्रह्मदेव, लक्ष्मीसह श्रीहरी, यम, अग्नि, वरुण इत्यादि तेहतीस कोटी देवांसह इंद्र तसेंच ज्याच्या अस्थीचीं गुनाभादि अस्त्रें करून त्रिपुरादि दैत्यांचीं शिरें उडविलीं तो दधिचि. समुद्राचें आचमन करून ज्यानें इल्वल व वातापि हे दैत्य भक्षण केले तो अगस्ति, ज्याच्या महा पतिव्रता छत्तिस स्त्रियांपासून सृष्टीची उत्पत्ति झाली तो कश्यप. क्षणांत प्रतिसृष्टि निर्माण करणारा विश्वामित्र, गंगा आणि वैतर्णी झांस द्विधा करून शापवचनानें अग्नीस भस्म करणारा

ब्रह्मसुत, त्याच प्रमाणें गौतम, वक्रदालभ्य, दुर्वास पराशर, मार्कंडेय, अत्रि, वशिष्ठ, पुलस्त्य, मरिच, च्यवन, ब्रह्मदत्त, विभांडक, इत्यादि मिळून चाळीस हजार शिवऋषि, वीस हजार विष्णुऋषि, आणि बावीस हजार ब्रह्मर्षि सोमयागाचे निमित्तानें आपणास काशीवास घडावा ह्मणून त्या ठिकाणीं आले होते.

सर्व तयारी झाल्यावर चंद्रानें यज्ञदीक्षा घेऊन यज्ञकर्मास सुरुवात केली. त्या वेळीं ऋषि मंडळींच्या ब्रह्ममंत्राची एकच गर्दी उसळली. नंतर हवनादि-प्रकार आटोपल्यावर चंद्रानें एकनिष्ठपणें श्री शंकराची स्तुति करून त्याला मनोभावें साष्टांग नमस्कार करितांच त्याची ती एकनिष्ठ सेवा पाहून त्यानें स्थापन केलेल्या चंद्रेश्वर लिंगांतून उमेसहित पंचमुखी शिवमूर्ति प्रगट झाली. हें पहातांच सर्व देवांनीं आणि ऋषिवर्गांनीं एकदम उठून श्री शंकरास साष्टांग नमस्कार केला. चंद्राचें अंतःकरण तर ज्याच्या मस्तकीं पिंगट जटा असून तींत गंगा उत्पन्न झाली आहे, मस्तकीं शिंदुराचा तिलक असून सर्वांगास विभूति लेपन केलें आहे, व्याघ्रांबर परिधान करून हातीं ज्यानें त्रिशूळ व डमरू घेतलें आहे, गळ्यासभोंवतीं सापाचा वेढा असून वामांगीं त्रिभुवनसुंदरी आदिमाया महासति जगन्माता पार्वती आहे अशा पंचवदन शिवरूपीं अगदीं तल्लीन झालें होतें.

चंद्राची अशी भक्ति पाहून श्रीशंकरानें मोठ्या-आनंदानें त्याला आपल्या दशभुजांनीं पोटाशीं

धरिलें आणि ह्मणाले " चंद्रा धन्य तुझी. त्वां आपल्या उग्र तपानें मला आपल्या स्वाधीन करून घेतलेंस. याकरितां आतां तुला जें काय पाहिजे असेल तें माग. आजपर्यंत त्रिभुवनांत सुद्धां कोणास दिला नाहीं असा पूर्ण वर मी तुला आनंदानें देतों. या शिवाय तुझी एकनिष्ठ भक्ति पाहून मी आपल्या खुशीनें तुला शंखिनी, पद्मिनी, लक्ष्मी, कामिनी, पयोष्णी, आश्चर्यवर्षिनी, आश्चर्यदा, आल्हादा, विनि, मादा, मोहिनी, प्रभाप्रदा, क्षीरवर्धिनी, वेगवर्धिनी, विकासिनी, व सोमिनी ह्या षोडश कळा तसेंच सत्रावी अमृत कळा ही प्राप्त होतील असा वर दिला आहे. ह्या षोडश कलेच्या योगानें लोक चांद्रमास व चांद्रवर्ष धरूं लागतील. ही सर्व देणगी मी तुला दिली आहे. शिवाय तुला जो कांहीं पूर्ण वर मागणें असेल तोही आणखी माग. हें ऐकतांच " मी सतत आपणापासीं असावें " असें चंद्रानें मागतांच श्री शंकरानें कालकूट विषापासून शरीरांत झालेला दाह शांत करण्याकरितां चंद्रास मस्तकीं धारण करून त्याची चंद्रलोकीं स्थापना केल्यावर त्याला बृहस्पतिपासून विद्या शिकण्यास सांगून आपण कैलासीं गमन केलें. अशा रीतीनें तपश्चर्यायोगाची समाप्ति झाली. नंतर शिवाज्ञेप्रमाणें चंद्रानें बृहस्पतीजवळून सर्व विद्या साध्य केल्यावर त्यानें गुरूला इच्छित गुरुदक्षणा मागण्याविषयीं विनंति केली. तेव्हां बृहस्पति ह्मणाले " चंद्रा, घरांत आमची पतिव्रता स्त्री तारा

आहे तिजकडे जाऊन तिच्या इच्छेनुरूप मागेल ती गुरुदक्षणा दे " असें सांगून ते तपानुष्ठाण करण्यास निघून गेले. चंद्रानें गुरूच्या आज्ञेप्रमाणें तारेच्या मंदिरीं जाऊन तिला मनोभावें साष्टांग नमस्कार केला आणि हात जोडून गुरुआज्ञेप्रमाणें इच्छित गुरुदक्षणा मागण्याविषयीं विनंति केली तेव्हां " तूं गुरुजवळून काय काय विद्या शिकलास तें मला दाखीव " असें तारा ह्मणाली.

ते वेळीं गुरुजवळून त्यानें साध्य केलेली कृष्णपक्ष व शुक्लपक्ष विद्या गुरुपत्नीस दाखविण्यास सुरवात केली. त्यानें प्रथम शुक्लपक्षीं शंखिनीपासून सोमिनी-पर्यंत सर्व कळा ग्रासून नंतर अमृतकळेमध्यें समावून पुन्हा कृष्णपक्षीं शंखिनीपासून सोमिनीपर्यंत तो परी-पूरित झाला. येणेंप्रमाणें साध्य केलेली विद्या गुरुप-त्नीस दाखवीत असतां, ती शिवकृपेनें अमृतकळेपासून प्राप्त झालेल्या व मदनासही तुच्छ करणाऱ्या चंद्रा-च्या अप्रतिम सौंदर्यानें कामपीडित होऊन त्याला ह्मणाली " चंद्रा तुझ्या अप्रतिम व अवर्णनीय स्वरूप-सौंदर्यानें माझ्या शरीरांत कामज्वर प्रदीप्त झाला आहे; तो मला रतिसुख देऊन त्वां शांत करावा. हीच गुरुदक्षणा तुजकडे मागणें आहे. "

तारेचे वरील शब्द चंद्राचे कानीं पडतांच तो ह्मणा-ला " तुमच्या आग्रहावरूनच मी तुह्मांस साध्य केले-ली विद्या दाखविली. परंतु त्यापासून तुह्मांस अशी विपरीत बुद्धि सुचून आह्मांस पापाचे वांटेकरी होण्याचा प्रसंग यावा ना? कांहीं तरी विचार करा

गुरुपत्नि ह्मणजे प्रत्यक्ष मातेसमान. तेव्हां पुत्राला लांछनास्पद भलभलतें बोलून त्याजबरोबर अनुचित कर्म करण्यास प्रवृत्त व्हावें हें आपणास योग्य काय? आज बृहस्पति ह्मणजे सर्व देवांचे गुरु तेव्हां आपण अर्थातच सर्व देवांच्या माता. सर्व देव आपली आज्ञा पाळण्यास कसे अगदीं एका पायावर तयार. पाहिजे ती असाध्य गोष्ट साध्य करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य. तुमच्याविषयीं त्यांच्या मनांत पूज्यभाव कसा पण अगदीं जागृत; परंतु ह्या सर्व गोष्टींस हर-ताळ फासून आपण एकदम दुष्कर्मी रत होऊं पहातां याचा काय परिणाम होईल याबद्दल थोडा तरी विचार करा. आज नाहीं उद्यां पण हें दुष्कर्म बाहेर पडतांच सर्व देवांच्या मनांतील पूज्यभाव एका क्षणांत नाहींसा होऊन, गुरुमहाराजांचा शाप-हि पण कदाचित् भोगावा लागेल. आणि या कृत्याबद्दल आपल्या नांवाचा डंका त्रिभुवनीं गाजून शेवटीं यमलोकीं नरकवासादि दुःसह यातना सहन कराव्या लागतील. यमधर्मापुढें सर्व पापाचा झाडा द्यावा लागेल. यमदूत धन्यापुढें घेऊन जातांना मा-र्गांत पापी मनुष्याचे जे भयंकर हाल करितात ते निमूटपणें सहन करावे लागतील; आणि तीं अनि-वार दुःखें पाहून मग मात्र आपल्या पूर्व कर्माचा प-श्चाताप होईल. कारण, पापी मनुष्यांना यमदूत प्रथम तापलेले लोखंडाचे कांटे पसरलेल्या ८६ हजार यो-जनें लांब अशा मार्गानें नेल्यावर पुढें दोन हजार योजनेंपर्यंत त्याला तप्त वाळूवरून नेतात. नंतर दहा

हजार योजनें तप्त भूमीवरून व सोळा हजार योजनें तीक्ष्ण शूळधारेवरून जावें लागतें. पुढें पुवाची नदी उतरून गेल्यावर तरी दुःखाचे डोंगर तयार असतातच. तप्त वाळूचे मोठमोठे ढिगार करून त्यांवर पापी मनुष्यांना यमदूत लोळवितात. अंगावर कडकडीत तापलेल्या तेलाचे कुंभ आणून ओतितात. तापलेल्या लोहस्तंभास आलिंगन देवविताल. नंतर लोहशूळावर चढवून वाघ, सिंह, उंदीर, कावळे व कुत्रीं ह्यांजकडून आंगाचें मांस खावविताल.

इतक्यानेंच दुःखाची सीमा होत नाहीं. पुढील यातना तर याहीपेक्षां वेगळीच आहे. हाय! हाय! नको तो प्रसंग. ज्याचें नांव घेतांच अंगावर कांटा उभा राहतो; असा जो नरकवास तो तुह्मांस व मला आपल्या दुष्कर्माबद्दल भोगावा लागेल. त्या शिवाय यमलोकींच्या इतर यातनाही भोगाव्या लागतील. या करितां ही दुष्ट बुद्धि सोडून आपण सन्मार्गी प्रवृत्त व्हा. दुष्कर्मापासून पराङ्मुख व्हावें ह्मणूनच आपणांस मी या यम लोकींच्या दुःसह यातना सांगून आपली कानउघाडणी केली. इतक्यावर आपली तशीच मर्जी असल्यास अमरावती, अलकावती, ध्रुवलोक, सत्यलोक, वैकुंठ, सूर्यलोक, शुक्रलोक ह्यांतून पाहिजे त्या ठिकाणी देव, ऋषि, ब्राह्मण, गंधर्व किंवा आणखी कोणी इतर मनुष्य आपल्या इच्छेनुरूप शोधून त्याजबरोबर खुशाल विषयोपभोग घ्या. त्यांत माझी कांहीं ना नाहीं. परंतु मज स्वतःविषयीं ह्मणाल तर मी तुह्मांस इतकेंच सांगतों कीं, मला

तुह्मीं अविचारी, मूर्ख, नपूंसक, अवज्ञा करणारा किंवा आणखी कांहीं वाटेल तें ह्मणा; परंतु तुमच्या ह्मणण्यास मी रुकार कदापि देणार नाहीं" असा चंद्रानें तारेला पुष्कळ उपदेश केला. परंतु ती विषयानें धुंद झाल्यामुळें त्या सर्व बोधामृताचा परिणाम ह्मणाल तर "मूर्खापुढें कहाणी व पालथ्या घड्यावर पाणी" किंवा "गाढवास सांगितलें ब्रह्मज्ञान, त्यानें हालविले दोन्हीं कान" या सारिखें अथवा "नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें" याप्रमाणें झाला.

तिनें चंद्राचा सर्व बोध एक कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून दिला; परंतु विषयवासना मात्र तिळःप्राय सोडिली नाहीं. ती चंद्राच्या अप्रतिम सौंदर्यस्वरूपांत अगदीं तल्लिन झाली होती. तिच्या डोळ्यापुढें मूर्तिमंत चंद्रावांचून दुसरें कांहींच दिसेना. त्यामुळें तिची कामवासना अधिकाधिक वाढत जाऊन ती चंद्रास ह्मणाली " या वेळीं आपण कितीही जरी उपदेश केला तरी तो मला विषतुल्यच वाटत आहे. आतां दुष्कर्मी रत झाल्यानें यमलोकीं दुसःह यातना सोसाव्या लागतात असें आपण ह्मणतां तथापि त्या बद्दल तुह्मांस कांहीं काळजी करणें नको. कारण, कालकूट विषापासून अंगांत झालेला दाह शांत करण्याकरितां तुह्मांस श्री शंकरानें आपल्या डोक्यावर धारण केलें असून तो तुह्मांस क्षणभरसुद्धां विसंबत नाहीं. मग यमलोकीं जाण्याचा प्रसंग तरी कसा येणार ? आणि तेथील दुःसह यातना तरी सहन कशा

फेराव्या लागतील ? आतां माझ्याविषयीं ह्मणाल तर मी पाहिजे त्या ठिकाणीं जाऊन पाहिजे तशा भयंकर यातना सोसण्यास खुशीनें तयार आहे. असें असून आपण मला यमलोक, इंद्रलोक, शुक्रलोक वगैरे ठिकाणचा पाहिजे तो मनुष्य शोधण्यास सांगतां; परंतु मी खात्रीनें सांगतें कीं, ब्रह्मदेवानें सर्व सृष्टींतील तेज एकत्र करून मदनास लाजविणारा जरी एखादा पुतळा निर्माण केला तरी तो मला तुच्छ आहे. मी तनमनधनेंकरून आपली काया तुह्मांस अर्पण केली, इतक्यावर माझी इच्छा पूर्ण करण्याची आपली मर्जी नसल्यास मी शाप देतें, तो तरी सुखानें ग्रहण करा."

इतकें बोलून चंद्राकडून काय उत्तर मिळतें तें ऐकण्याकरितां ती स्तब्ध राहिली; परंतु तारेचें वरील सर्व बोलणें लक्ष लावून ऐकत असतां "मर्जी नसल्यास माझें शापवचन तरी सुखानें ग्रहण करा" असे तारेच्या मुखांतून निघालेले शब्द चंद्राच्या मर्मस्थानीं बाणाप्रमाणें बोंचले. व उरांत एकदम धडकी बसून काळीज धडधडूं लागलें. तोंड अगदीं फिक्कें पडलें व शरीर कंपायमान होऊन त्यावर रोमांच उभे राहिले. पहा! ज्यानें आपल्या अतुल पराक्रमानें रणांगणांत मोठमोठ्या धुरंधर योद्ध्यांस हतवीर्य करून सोडावें त्याच चंद्रास तारा ह्मणजे यःकश्चित स्त्री; कितीहि झालें तरी ती अबलाच ; परंतु तिच्या मुखांतून निघालेल्या "शापवचन" या पांच अक्षरांनीं "दे माय धरणी ठाय" असें होऊन जावें काय?

काय करील बिचारा? पतिव्रतेच्या शापाचें देवादिकांसही निवारण होत नाहीं; आणि तारा ही तर महा पतिव्रता आहे. हें त्याला पक्कें ठाऊक होतें. त्यामुळें या वेळीं चंद्राला " मागें आड व पुढें विहीर " असें होऊन काय उत्तर द्यावें हें त्याला सुचेनासें झालें.

शवटीं तारेच्या म्हणण्यास रुकार दिल्यावांचून आपला बचाव होणें कठीण आहे अशी चंद्राची पक्की खात्री झाल्यावर त्यानें आपला हात निराशेनें कपाळावर मारून एक दुःखाचा सुस्कारा सोडिला व हळुच मान हालवून तारेच्या म्हणण्यास रुकार दिलासें दाखविलें. चंद्राची कबुली मिळतांच तारेचें हृदय आनंदानें उचंबळूं लागलें. तिनें लागलीच चंद्राचा हात धरून त्याला विलासमंदिरांत नेलें. अहाहा! काय तें शयनगृह! त्याचें कितीही वर्णन केलें तरी तसें शयनगृह ह्या भूलोकीं नसल्यामुळें तें अपुरेंच होणार आहे. असो. त्या सौख्यमंदिरांत नेल्यावर तिनें आपली कामवासना शांत केली; व पुढेंहि तसाच क्रम सुरू ठेविला. कांहीं दिवसांनीं तपानुष्ठाण साधून बृहस्पति घरीं येतांच त्याला परिजनांकडून ही बातमी मिळाली. तेव्हां तो तसाच अमरावतीस इंद्राकडे गेला आणि त्यानें ही सर्व हकिकत त्याला सांगितली. त्या वेळीं इंद्रानें लागलेंच आपलें सर्व सैन्य तयार करून यम, अग्नि, वरूण इत्यादि तेहत्तीस कोटी देव बरोबर घेऊन चंद्रलोकीं गमन केलें. आणि शितकरास युद्धाकारितां हाक मारिली. चंद्रानेंही आपली सर्व तयारी करून रणांगणीं गमन केलें. तेव्हां इंद्र

ह्मणाला " शाबास! शाबास! गुरुपत्निशिवाय तुह्मांला इतर स्त्रियाच नव्हत्या अं! गुरुपत्नि ह्मणजे प्रत्यक्ष माता असें असून तिशीं व्यभिचारकर्म बेधडक केलेंस काय? निर्लज्जा आतां हें कृष्णवदन घेऊन तूं गुरुपुढें त्यांना नमस्कार करण्यास येशील काय? हें ऐकतांच चंद्र ह्मणाला " बस. बस. उगीच वाचाळाप्रमाणें वडबड करण्याला लाजसुद्धां वाटत नाहीं काय? ह्मण आहे कीं, लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडें पाषाण. त्याप्रमाणें गौतमस्त्रीशीं रत होऊन आपली सर्व काया भगांकित केलीस त्या वेळीं तुझें ब्रह्मज्ञान कोठें गेलें होतें? नीचा आपलें सगळें वर्म झांकून उगीच मीपणाचा डौल मात्र दाखवितोस अं! तुह्मां सर्वांमध्यें शौर्य असेल तर मजबरोबर दोन हात करून मग पाहिजे तर गुरुपत्नीस घेऊन जा. हें होत नसल्यास हातामध्यें कंकणें घालून खुशाल घरीं स्वस्थ वसा. हें ऐकतांच एकदम लढाईला शंखध्वनि सुरू झाला. उभयपक्षांचे वीर एकमेकांवर तुटून पडले. त्या वेळीं बाणांच्या समुदायाचा जणूं दाट मंडपच बनून जिकडे तिकडे अंधकार पडला. शस्त्रास्त्रांचे धाड् धाड्, तरवारींचे सप्प सप्प, भाल्यांचे कच्च कच्च अवाज, वीरांचीं हां! हां! मारा! हाणा! तोडा! इत्यादि गर्जनायुक्त आवेशांचीं भाषणें, रणवाद्यांचा गडगडाट, शस्त्रघर्षणाचा चकचकाट, अस्त्रांचा कडकडाट, ह्यांनीं दाही दिशा दणाणून गेल्या. परस्परांनीं परस्परांचा पराभव करण्याकरितां आपल्या आंगांतील सर्व शौर्य प्रगट केलें. शेवटीं

चंद्रानें एक अस्त्र सोडितांच; इंद्रपक्षाकडील सर्वत्रांस कापरें भरून त्यांनीं पलायन केलें.

नंतर इंद्रानें बृहस्पतीला चंद्राचा पराभव कसा होईल ह्मणून विचारिलें तेव्हां बृहस्पति ह्मणाले "फक्त कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं तो फारच अशक्त असतो. त्या दिवशीं मात्र तुह्मी त्याचा पराभव करूं शकाल. एरवीं तो तुह्मा सर्वत्रांस अजिंक्य आहे" हें ऐकतांच कृष्णचतुर्दशीचे दिवशीं इंद्रानें चंद्रलोकीं जाऊन शितकरावर स्वारी केली. तेव्हां मात्र चंद्राला निरुपायास्तव श्रीशंकराजवळ पळून जाणें भाग पडलें परंतु इंद्रानेंहि त्याचा पाठलाग केला. पण कैलासीं जातांच गजपतीनें या सर्वांबरोबर युद्ध करून सर्व देवांचा पराभव केला. तेव्हां ब्रह्मदेवास बरोबर घेऊन इंद्रादि देव कैलासीं श्री शंकराजवळ गेले; आणि ही सर्व हकीकत शिवास सांगितली. तेव्हां सर्वांचें समाधान करून महादेवानें चंद्राकडून तारा बृहस्पतीस देवविली. तारेला घरीं आणतांच तिच्या पोटांतील चंद्राचा गर्भ बृहस्पतीनें बाहेर काढून तिची शुद्धि केली. इकडे तिच्या पोटांतील गर्भाचें ब्रह्मदेवानें संरक्षण करून त्याचें 'बुध' असें नांव ठेविलें. अशा रीतीनें आलेलें संकट शिवकृपेनें अनायासें दूर झाल्यामुळें चंद्रालाही आनंद होऊन तो आपल्या रोहिणीस्त्रीसह शिवानें स्थापन केलेल्या चंद्रलोकीं अद्यापपावेतों सुखानें कालक्रमणा करीत आहे.

वाचकहो, दुष्कर्मीं रत झाल्यानें आपली व आपल्या कुळाची अपकीर्ति होऊन आपणास कसकशीं संकटें

भोगावीं लागतात हें चंद्रानें आपल्या वर्तनानें लोकांस कसें दाखविलें पहा.

## हरिश्चंद्र चरित्र.



कसोटीवर घासलें असतां सुवर्णाची खरी परीक्षा होते; त्याप्रमाणेंच मनुष्याच्या स्वभावाचें आहे. त्याच्यावर जे भ बरे-वाईट प्रसंग येतात, तेणेंकरून त्याची खरी परीक्षा होते. ह्मणजे, परीक्षस्तव सुवर्णाला दगडावर झिजावें लागतें. तसेंच सद्गुणी माणसाचें आहे. कोणताही प्रसंग पडला, कितीही विपत्ति प्राप्त झाली, तरी सद्गुणापासून ढळावयाचे नाहींत तेच खरे थोर. याविषयीं आपल्या पुराणादि ग्रंथां तून अनेक उदाहरणें देतां येतील. विश्वामित्रासारखा छलक मिळाला असतांही प्राप्त झालेलीं असंख्य दुःखें भोगून, ज्या महात्म्या पुरुषानें आपलें सत्य कायम ठेविलें, त्या सत्वधीर

राजा हरिश्चंद्राची धवलकीर्ति, ऊर्वीमंडळावर गाजत राहिली आहे, यांत नवल कोणतें?

पवित्र आणि प्रसिद्ध अशी जी शरयुनामक नदी, तिच्या कांठीं अयोध्या नगरांत, सूर्यवंशोत्पन्न राजा हरिश्चंद्र राज्य करीत होता. हा राजा जसा सत्वधीर होता, तसाच सकलश्रेष्ठ गुणमंडित, प्रजावत्सल होता. हा बलीप्रमाणें दाता, कुबेरासारखा संपत्तिवान व महाविष्णुतुल्य पराक्रमी होता. याचे प्रधान स्वामीकार्यदक्ष, राजनीतिविशारद, सत्याश्रेय आणि न्यायी होते. त्या हरिश्चंद्रानें पुष्कळ दिवस राज्यासनाचा उपभोग घेतला. त्याला सर्व सुख अनुकूल होतें. त्याची स्त्री सतरतिव्रता तारामती पतिसेवेंत सर्वदा सादर असे. तिला लक्ष्मीची किंवा पार्वतीची उपमा योग्य होती.

हरिश्चंद्राला सर्व गोष्टींची अनुकूलता असतां, अपत्य नसल्यामुळें त्याला थोडीशी उद्विग्नता झाली होती. रविवंश वृक्षाची वाढ आतां खुंटते कीं काय, असें त्याला वाटलें होतें. उभयतां राजा राणींनीं पुष्कळ व्रतें उपोषणें केलीं, नानाप्रकारचीं दानें दिलीं, साधूंची सेवा केली, तथापि त्यांचे मनोरथ, पुष्कळ दिवसपर्यंत पूर्ण झाले नाहींत.

तेव्हां हरिश्चंद्रानें तपश्चर्या आरंभिली. शरयु नदींत, आकंठ जलांत उभें राहून, त्यानें वरुणाची आराधना चालविली. बरेच दिवस झाल्यावर अंबुधिपति त्या तपश्चर्येच्या योगानें संतोषित होऊन, प्रत्यक्ष रूपानें राजाला दर्शन देऊन ह्मणाला, हे रविकुलमुगुटमणे हरिश्चंद्रा, तुझी इच्छा काय आहे? तेव्हां राजा ह्मणाला परमेश्वराच्या कृपेनें सर्व-

काहीं अनुकूल आहे. परंतु, वंशवृद्धीस्तव पोटीं पुत्रसंतान नाहीं, तेवढें कृपा करून द्यावें.

वरुण ह्मणाला, माझ्या अशिर्वादानें तुला बात्तिस लक्षणी पुत्र होईल. परंतु, त्याला जेव्हां मी मागेन, तेव्हां तुला द्यावा लागेल. हरिश्चंद्रानें मनांत विचार केला कीं, हा मागेल तेव्हां देण्याचें कबूल करावें. याच्या प्रसादानें पुत्रमुख तरी पहावयास सांपडेल. असा विचार करून राजा वरुणाला ह्मणाला, देवा, कांहीं चिंता नाहीं. तमच्या इच्छेस वाटेल तेव्हां घेऊन जा; तेव्हां अरुणानें बरें ह्मणून तो स्वस्थानीं निघून गेला.

इकडे तारामति गर्भवति झाली. नवमास पूर्ण होतांच, तिला पुत्र झाला. आपले मनोरथ पूर्ण झाले. वरुण प्रसादानें पुत्रवान् झालों असें पाहून राजास धन्यता वाटली. त्यानें पुत्रोत्सव मोठ्या थाटानें केला. बंदिवानाचे बंध मोकळे केले; आश्रितांस मोठमोठीं बक्षिसें दिलीं; याचक जें जें मागावयास येत, तें तें तो त्यांस देत असे; ब्राह्मणाकरितां त्यानें द्रव्य-भांडार तर मोकळेंच केलें होतें; त्या वेळीं ब्राह्मणांनीं द्रव्याच्या एवढ्या मोठ्या मोटा बांधिल्या कीं, घराकडे जात असतां त्यापैकीं कित्येक अर्धमार्गीतच त्या ओझ्यानें टेकिस येऊन त्यांनीं जागजागीं सुवर्णमुद्रा टाकून देऊन ओझें हलकें केलें!!

कुलगुरु वसिष्ठमुनीला बोलावून त्या पुत्राचें नामकरण केलें. गुरूनीं त्याचें नांव रोहिदास असें ठेविलें. व हा रविकुलाचा विस्तार करील असें सांगितलें.

त्या रोहिदासाला जन्मून सोळा दिवस झाले; त्या वेळीं राजा सभेंत बसला असतां, एकाएकीं तेथें वरुण येऊन राजाला ह्मणाला हे सत्यप्रिय हरिश्चंद्रा, तूं पुत्रमुखावलोकन केलेस,

आतां तो पुत्र मला देऊन आपलें वचन खरें कर. तें ऐकून राजाला मोठा विचार पडला. त्याला आपत्य झालें नव्हतें, तेथपर्यंत आपत्यमुखावलोकनाची इच्छा मात्र त्यास होती; ती पूर्ण झाल्यावर आपत्यसौख्याची प्रबल इच्छा त्याला उत्पन्न झाली!! परंतु, वरुणाला नाहीं ह्मणावें तर असत्य बोलण्याचा दोष लागतो! असा विचार मनांत येऊन तो हरिश्चंद्र मोठ्या बुचकळ्यांत पडला! कांहीं वेळ गेल्यावर तो वरुणाला ह्मणाला देवा, तुझ्याप्रसादानें मी पुत्रवान झालों. आतां तो पुत्र तुझाच आहे. तुला वाटेल तेव्हां घेऊन जा; पण त्याला दांत निघाल्यावर घेऊन जाशील तर मजवर मोठे उपकार होतील!!

वरुणानें राजाचें बोलणें मान्य केलें, व तो स्वस्थानीं निघून गेला. रोहिदास दिवसेंदिवस वाढत होता. योग्य समयीं त्याला दंत फुटले. व तो थोडें थोडें बोलूं लागला. त्याची बालक्रीडा पाहून, उभयतां राजा राणीस मोठें कौतुक वाटे. दिवसेंदिवस त्यांचें पुत्रवात्सल्य वाढत चाललें. रोहिदास सोळा महिन्यांचा झाला, तेव्हां राजाचे वचनाची वरुणास स्मृति होऊन तो अयोध्येस आला, आणि राजाजवळ रोहिदास मागूं लागला.

पूर्वीपेक्षां या वेळीं राजाला मोठीच पंचाईत पडली! आतां वरुणाला कांहीं सांगितलें तरी तो ऐकणार नाहीं, असें त्याला वाटलें. परंतु, उपाय करून पहावा, असें मनांत येऊन तो नम्रमणानें वरुणाला ह्मणाला देवा आपण आलांत, ठीक झालें. रोहिदासाला घेऊन जा; पण, याला तुह्मीं कशाकरितां नेणार, तेवढें कृपाकरून सांगा.

वरुण ह्मणाला, नरयाग करावा, असा माझा पुष्कळ

दिवसांचा हेतु आहे. आणि त्याच कारितां, मी या वत्तिस लक्षणी रोहिदासाला घेऊन जाणार.

राजानें हांसून उत्तर केलें; मग हा सध्यां आपल्या काय कामाचा? मौंजीबंधनाशिवाय हा शूद्रतुल्य आहे. व्रतबंधसंस्कारानंतर याला द्विजत्व येईल, व मग हा तुमच्या कामास पडेल. तथापि, देवाची मर्जी असेल तसें! वरुणाला राजाचें ह्मणणें सयुक्तिक दिसलें. तो ह्मणाला, कांहीं चिंता नाहीं. याचा व्रतबंध झाल्यावर मात्र याला मी ठेवणार नाहीं. हरिश्चंद्रानें सध्यांची वेळ पुढें लोटली, असें पाहून आनंद मानिला. वरुणही आपल्या स्वस्थानीं गेला. रोहिदासाला सातवें वर्ष लागलें. कुलगुरु वसिष्ठाच्या अनुमतानें राजानें त्याचें उपनयन केलें. तो आठ वर्षांचा झाला, तेव्हां वरुण पुन्हा राजाकडे आला; आणि रोहिदासाला मागूं लागला असतां, राजाला त्याही वेळीं संकट पडलें. परंतु, वचन दिलें त्या अर्थी नाहीं ह्मणतां येत नाहीं, याला तीन वेळा परत केला; आतां हा ऐकेल असें वाटत नाहीं. तथापि, आणखी एक वेळ त्याला कांहीं तरी कारण सांगून वाटेला लावावें. असा विचार मनांत येऊन राजा ह्मणाला, वरुणा, रोहिदासाला आतां द्विजत्व आलें आहे; तथापि, तो विद्वान होऊन आपल्याकडे जावा, अशी माझी फार फार इच्छा आहे, ती आपण कृपाळु होऊन पूर्ण करावी!

वरुण त्याही वेळीं राजाच्या बोलण्याचा अव्हेर न करितां परत गेला. हरिश्चंद्रानें, रोहिदासाला अनेक विद्या शिकविण्याकरितां, मोठमोठे जगद्विख्यात गुरु आणून ठेविले. थोड्याच काळांत तो तैलबुद्धि राजकुमार सर्व

विद्या आणि कला यांत निपुण झाला. त्याचें बाळपण संपत आलें होतें, त्याच्या अंगच्या अनेक सद्गुणांनीं, तो अल्पवयांतच लोकप्रिय झाला होता. कित्येक गुणांत तर तो पित्यापेक्षां कांकणभर सरसच होता. त्याला सोळावें वर्ष लागलें. एके दिवशीं, एकाएकीं वरुणाची स्वारी भृत्यगणांसह येऊन पोंहोचली. त्यास पहातांच, राजाला किंचित् वाईट वाटलें. तथापि, बाहेर कांहीं एक दुःख न दाखवितां, त्यानें वरुणाचा यथोचित् आदरसत्कार केला. थोडा वेळ गेल्यावर वरुण ह्मणाला, अयोध्यापते आतां मात्र मी तुझें कांहीं एक ऐकणार नाहीं. रोहिदासाला तूं माझ्या स्वाधीन कर.

राजा ह्मणाला, देवा, आजही आपली हवशी खेप, तीन वेळां मी आपल्याला भीड घातली. आतां तसें करणार नाहीं रोहिदास गजशाळेंत गेला आहे, त्याला परभार आपण घेऊन जावें!

हें ऐकतांच वरुण आपल्या भृत्यांसह, राजाच्या गजशाळेंत गेला तेथें रोहिदासाला पाहून, त्यानें आपल्या सेवकांना सांगितलें कीं, या राजकुमाराला धरून आणा; तें ऐकतांच आज्ञाप्रमाण ह्मणून ते वरुणसेवक, राजपुत्रास धरण्याकरितां गेले असतां, त्यानें स्वपराक्रमानें त्या समस्तांस बांधून टाकिलें!!

तें पाहून, वरुणाला फार क्रोध आला. तो राजपुत्रावें शासन करावें ह्मणून, धनुष्याला बाण लावून पुढें गेला असतां, त्या तेजस्वी राजकुमारानें दरडावून सांगितलें कीं, "खबरदार!! पुढें पाउल घालसील, तर माझ्या हातून मरशील! तें ऐकून वरुण मनांत दचकला. तो ह्मणाला, हा धनुर्धारी, आपल्याला दाद देणार नाहीं.

हें वर्तमान हरिश्चंद्रास समजतांच, तो धांवतच तेथें आला, आणि रोहिदासाला ह्मणाला, माझें वचन सत्य करण्याकरितां, तुला यांच्याबरोबर गेलें पाहिजे! तुझ्या या दांडगाईबद्दल; मीं चांगलें शासन करितों.

बापाची रागीट मुद्रा पाहून, त्याचें बोलणें पुरें न ऐकतांच तो चपल राजकुमार तेथून पळाला, तो दूर अरण्यांत निघून गेला!

हा प्रकार पाहून वरुण मनांत ह्मणाला, प्रत्यक्ष देवांसही ज्याचें क्षात्र तेज भीति उत्पन्न करितें, ता नरयागाच्या उपयोगीं पडणार नाहीं. आतां आपण येथून निघून जावें हेंच उत्तम! असा विचार करून, तो सेवकांसह स्वस्थानीं जाता झाला.

याप्रमाणें युक्ति योजून, हरिश्चंद्रानें रोहिदासाचें रक्षण केलें. या गोष्टीला कांहीं दिवस लोटल्यावर, एके समयीं हरिश्चंद्रराजा, उदकामध्यें स्नानार्थ उतरला असतां, पूर्व द्वेषामुळें, वरुणानें राजाला धरिलें. तें वर्तमान राजपुत्राला समजताच, तो तेथें आला, आणि वरुणावर अग्निबाण सोडून, त्याला पळावयास लाविलें व हरिश्चंद्राचें रक्षण केलें!! तथापि, वरुणाची आपल्यावर प्रसन्नता रहावी, एतदर्थ राजानें अजिगर्ताचा पुत्र विकत घेऊन, तो वरुणाला अर्पण केला, व त्याची कृपा संपादिली.

हरिश्चंद्र, यथान्याय प्रजापालन करीत असे. त्या वेळीं त्या अयोध्या नगरीनें अमरावतीसही खालीं पहावयास लाविलें होतें. एके दिवशीं ब्रह्मपुत्र नारदमुनि, सहज हरिश्चंद्र राजाचे सभेंत प्राप्त झाले असतां, राजानें योग्य प्रकारें देवर्षीचें आगतस्वागत केल्यामुळें ते संतोषित

झाले. व तसेच अमरावतींत, इंद्रसभेंत गेले. त्या वेळीं तेहतीस कोटी देव, गंधर्व, किन्नर, सिद्ध, वसिष्ठ, विश्वामित्र प्रमुख तपोनिधि मुनि, यांहींकरून तें सभास्थान मंडित झालें होतें. इंद्रानें नारदाचें यथोचित् स्वागत केलें. व सहज प्रश्न केला कीं, हे देवर्षे, आपलें त्रिभुवनांत गमन आहे. तेव्हां आज कोठें कांहीं अपूर्व अवलोकन केलें असल्यास सांगावें.

नारदांनीं पुण्यशील हरिश्चंद्राची, त्याच्या कांता पुत्राची व अयोध्या नगरीची थोरवी गाइली. ते ह्मणाले, सुरपते, हरिश्चंद्र राजा ह्मणजे भानुवंशाला एक भूषणभूत, सकल नृपालांचा मुकुटमणि, पुण्यशील, दाता आहे. मला वाटतें, मृत्युलोकींच काय, पण स्वर्गलोकींही त्याची बरोबरी करणारा कोणी सांपडणार नाहीं. त्याच्या वास्तव्यानें ती अयोध्या नगरी, त्रिभुवनांतील सर्व नगऱ्यांहून श्रेष्ठ आहे. त्याची स्त्री तारामती, ही तर केवळ उमा अथवा रमाच आहे कीं काय, असें वाटतें! त्या राजाराणींची गोष्ट असो; पण त्यांच्या रोहिदास नामक सत्पुत्राचीही कोणी बरोबरी करणारा त्रिभुवनांत नाहीं!

तें ऐकून, इंद्राला मोठें समाधान वाटलें. हरिश्चंद्राचे कुलगुरु वसिष्ठ मुनि जवळच होते, त्यांनींही नारदाचें बोलणें सत्य सत्य आहे, असें ह्मटलें; परंतु हें त्या गाधिजमुनीला आवडलें नाहीं. वसिष्ठाचा व विश्वामित्राचा उभा दावा! विश्वामित्र ह्मणाला, नारदा, तूं त्या राजाचें एवढें वर्णन करितोस, परंतु इतर गुणांविषयीं कांहींही असो, पण, माझ्यासारख्याजवळ प्रसंग पडला, तर तो आपलें सत्व सांडील, यांत मात्र शंका नको!

वसिष्ठ ह्मणाले, ही गोष्ट कालत्रयींही होणार नाहीं तो सर्वस्वास मुकेल, प्राणावर येऊन बेतली तरीही सत्व ह्मणून सोडावयाचाच नाहीं. तें ऐकून विश्वामित्राला क्रोध आला. तो ह्मणाला, ज्यानें प्रत्यक्ष ब्रह्मदेवासीं स्पर्धा केली प्रति सृष्टि निर्माणास आरंभ केला, त्या विश्वामित्राशीं गांठ पडली तरीही सत्वापासून ढळावयाचा नाहीं ह्मणतां काय? बरें मीं जर त्या हरिश्चंद्राला सत्वभ्रष्ट न करीन, तर शिखा-यज्ञोपवितत्युक्त, स्नानसंध्याविरहित ब्राह्मणाला जें पाप लागतें, तें माझ्या शिरावर बसेल. तो राजा जर सत्वापासून ढळला नाहीं, तर मीं पन्नास कोटी तप केलें आहे, ह्याचें सर्व पुण्य त्यास अर्पण करीन !!

याप्रमाणें त्यानें घोर प्रतिज्ञा केली. आणखींही, पुष्कळ प्रकारें त्यानें प्रतिज्ञा केल्या; तें ऐकून वसिष्ठ ह्मणाला, आपला एवढा पुण्यसमुद्र आहे तथापि, हरिश्चंद्राचें सत्व नाहींसें करण्यास तो पुरणार नाहीं!!

वसिष्ठाचें भाषण ऐकून, तो विश्वामित्र क्रोधानें अगदीं संतप्त झालेला पाहून, इंद्रानें सभा विसर्जन केली व सर्व आपापल्या ठिकाणीं निघून गेले. वसिष्ठमुनि, इंद्रसभेंतलें वृत्त हरिश्चंद्राला सांगावें ह्मणून तत्काळ अयोध्येस आले. विश्वामित्रानें केलेली प्रतिज्ञा त्यांनीं हरिश्चंद्राला सांगितली; व ते हरिश्चंद्राच्या कल्याणार्थ प्रयागास येऊन तपश्चर्या करूं लागले.

विश्वामित्र इंद्रसभेंत प्रतिज्ञा करून निघाला, तो आपल्या सिद्धाश्रमास आला. त्यानें अग्निकुंड पेटवून, आपल्या आंगाचें मास तोडून तोडून अवदानें देतअसतां प्रत्यक्ष भवानी प्रगट होऊन, तिनें त्या विश्वामित्राच्या

विनंतिवरून हजारों व्याघ्र निर्माण केले. ते व्याघ्र अयोध्या नगरासमीप येऊन, त्यांनीं मार्ग रोखिले, व अयोध्यावासी जनांला उपद्रव देण्यास आरंभ केला.

प्रजावत्सल हरिश्चंद्राला, तें वर्तमान समजतांच, तो तारामतीराणीसह, सैन्य बरोबर घेऊन, त्या व्याघ्रांचा नाश करिता झाला. इतक्यांत, विश्वामित्रानें निर्माण केलेल्या दोन हरिणी राजाचे दृष्टिस पडल्या; त्यांस मारावें ह्मणून तो त्यांच्या मागें लागला असतां, त्या हरिणींनीं, त्याला विश्वमित्र मुनीचे आश्रमासंन्निध आणून, आपण गुप्त झाल्या !!

तें रमणीय वनस्थळ अवलोकन करून, त्या श्रमित झालेल्या राजाला, तेथें विश्रांति घेण्याची इच्छा झाली. इतक्यांत, विश्वामित्रानें दोन अति लावण्यवति कलावंतिणी निर्माण करून, त्यांना राजाकडे पाठविल्या. त्या देवांगनासही लाजविणाऱ्या नवयौवना स्त्रियांनीं, नृत्यगायनादिकें करून, हरिश्चंद्राचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; तेव्हां राजाच्या सत्वकीर्ति नामक प्रधानास राग येऊन, त्यानें सेवकांकडून त्यांस मार देववून, घालवून दिल्या. तेव्हां त्या रडतच विश्वामित्राकडे आल्या असतां, त्या मुनीला मोठा राग आला, आणि तो शिष्यांसहवर्तमान, राजा ज्या स्थळीं होता, तेथें आला क्रोधानें त्याचें आंग लटलट कांपत होतें; व त्याचे नेत्र आरक्त झाले होते. त्यास पाहून, राजानें नमस्कार केला. तेव्हां तो क्रोधावश झालेला विश्वामित्र ह्मणाला, चांडाळा, माझ्या आश्रमाकडे कां आलास? या माझ्या सिद्धाश्रमांत, चित्ते, वृक व्याघ्र आणि हरिणी यांमध्यें द्वेशभाव वागत नाहीं. असें असतां

तूं माझ्या व्याघ्रांचा संहार केलास. त्याचीं तीं दुरुत्तरें सहन करूनही, राजा, राणी व सत्वकीर्ति प्रधान, यांनीं त्या मुनीचे पाय धरिले. राजा ह्मणला, माझ्या ह्मातून नकळत आपला अपराध घडला याची क्षमा करावी!

विश्वामित्र रागारागानें तेथून निघून गेल्यावर, राजानें पुढचा मार्ग धरिला. इतक्यांत, एक जलपूर्ण सरोवर अवलोकन करून तेथें स्नान करण्याच्या हेतूनें, हरिश्चंद्र सर्वांसह राहिला; क्षणभर विश्रांति घेऊन, श्रम परिहार झाल्यावर पुढें नगराकडे जाणार इतक्यांत सूर्यास्त झाल्यामुळें त्या रात्रीं राजानें तेथेंच मुक्काम केला.

त्या सरोवरतीरीं असलेल्या शिवालयांत, राजा राणीसहवर्तमान निजला असतां, मध्यरात्रीचे सुमारास, त्यास एक स्वप्न पडलें, एका ब्राह्मणास आपण नवखंड पृथ्वीचें राज्य दान दिलें. व अंकुश, लगाम, आणि लेखणी हींही दिलीं. असें स्वप्न पाहून राजा जागा झाला. प्रातःकाल झाल्यावर, सत्वकीर्ति प्रधानाला तें स्वप्न सांगितलें. तेव्हां प्रधान ह्मणाला, महाराज, आतां प्रभातसमय झाला आहे. या सिद्ध सरोवरांत स्नान करून, दुष्टस्वप्नशमनार्थ कांहीं दानादिक करावें.

राजा स्नान करावयास गेला असतां, विश्वामित्र रूप पालटून तेथें आला; आणि राजाला ह्मणाला, मी तुला स्नानाचा संकल्प सांगतों, मी मागेन ती दक्षिणा तूं मला दे. राजानें होय ह्मटल्यावर ब्राह्मणानें संकल्प सांगितला; स्नानानंतर ब्राह्मणानें औटभार सुवर्ण मागितलें. व राज्यही मलाच दान दिलें आहेस, असें बोलला. राजा त्या ब्राह्म-

णाला ह्मणाला, भूदेव, आपण अयोध्येस चलावें, तेथें आपली दक्षिणा देईन.

ब्राह्मणानें ठीक आहे असें ह्मटल्यावर, तारामतीसह राजा स्वनगरांत आला. तारामति सुखासनावर बसावयास जात असतां, विश्वामित्रानें (ब्राह्मणरूपधारी) तिला खालीं ओढिलें; आणि दरडावून ह्मणाला, मला राज्य दान दिलें, आतां तूं या माझ्या आसनावर काय ह्मणून बसतेस? राजालाही तो सिंहासनावर बसूं देईना; इतक्यांत तें वर्तमान रोहिदासाला समजतांच तोही तेथें आला. आईबापाला कोणी मुनिवर्य दुरुत्तरानें ताडण करीत आहेत, असें पाहून त्यानें चौकशी केली कीं, हें काय आहे? तेव्हां, हा ऋषि आपली दक्षिणा मागाण्याकरितां आला असून, राजानें स्वप्नांत याला सर्व राज्य समर्पण केलें असल्यामुळें दक्षिणा देण्यास आतां कांहीं राहिलें नाहीं, यास्तव हा राजाराणीला ताडण करितो आहे, असें त्याला समजतांच त्यानें त्या ब्राह्मणाला साष्टांग नमस्कार घातला; आणि विनयानें ह्मणाला, महाराज, मीं आपल्या आंगावरच्या बहुमुल्य दागिन्यांनीं आपली दक्षिणा पुरी करून देईन. विश्वामित्रानें रागानें त्याच्याकडे पाहिलें. व त्यासही दुरुत्तरें बोलूं लागला असतां, प्रधान येऊन हात जोडून ह्मणाला विप्रवर्य मी आपली दक्षिणा देतों; परंतु या त्रिवर्गास आपण दुःख देऊंनये.

या प्रमाणें मोठमोठ्या धनिकांनीं, व्यापाऱ्यांनीं व प्रधानादिकांनीं सांगितलें असतां, तो ब्राह्मण फारच रागावला; आणि ओरडून ह्मणाला, मूर्खहो; हरिश्चंद्रानें मला नवखंड पृथ्वीचें राज्यदान दिलें आहे; आपण त्या नवखंडाचे

बाहेर रहातां काय? याप्रमाणें त्याच्यापुढें कोणाचेंच कांहीं चालेना; राजाही अगदीं दीनवदन झाला. तेव्हां विश्वामित्र ह्मणाला, राजा, दक्षिणा देत असशील तर दे, नाहींतर सत्व सोड!!

राजा ह्मणाला मुनिवर्य, दहावें खंड जें काशी तेथें चलावें. मी आपली दक्षिणा आजपासून सातवे दिवशीं फेडीन! ब्राह्मणानें ती गोष्ट कबूल केली; तेव्हां राजा हरिश्चंद्र तारामती व रोहिदास यांसहवर्तमान, वाराणसी-क्षेत्रास जावयाकरितां, अयोध्येचा त्याग करून निघाला.

त्या वेळीं अयोध्यानगरवासी जनांला महद्दुःख झालें. त्यांनीं त्या विश्वामित्राला पुष्कळ शिव्या-शाप दिले. असो, इतका प्रकार झाला तरी त्या ब्राह्मणाला दया आली नाहीं. ज्या वेळीं तीं त्रिवर्ग नगराबाहेर पडलीं त्या वेळीं अयोध्या-वासी लोकही, त्यांच्याबरोबर जावयास निघाले; असें पाहून विश्वामित्र ह्मणाला, हरिश्चंद्रा या लोकांना तूं बरो-बर घेऊन गेल्यावर, मीं मागें काय जनावरांवर राज्य चालवावें? त्या वेळीं हरिश्चंद्रानें, नागरिकांना हात जोडून सांगितलें कीं, बापहो, आजपासून हे महाराज आपले राजे आहेत; तुमचा आमचा ऋणानुबंध तुटला! आतां शोक न करितां नगरांत जाऊन सुखरूप रहावें! त्या वेळीं नाइलाज होऊन नागरिक परत गेले. सातव्या दिवशीं वाराणसीस जाऊन पोंहचलें पाहिजे, ह्मणून तीं त्रिवर्ग त्वरेनें मार्ग क्रमूं लागलीं.

इकडे विश्वामित्रानें, वरुणाला आज्ञा केली कीं, हरिश्चंद्र ज्या मार्गानें जाईल तिकडे यत्किंचित् सुद्धां उदक मिळ-णार नाहीं असें कर; सूर्याला सांगितलें कीं, तूं आपल्या

पूर्ग द्वादश कल्पांचीं तापावें. त्याप्रमाणें त्यांनीं केलें! वरून प्रखर सूर्यताप खालीं जमीन विस्तवासारखी तापलेली! असा कोरडा पडला तरी तोंडास लावावयासच नव्हे पण डोळ्यांस लावावयास'सुद्धां पाणी नाहीं. वृक्ष करपून गेलेले! अशा समयीं तीं त्रिवर्ग जात असतां विश्वामित्रानें वृद्ध ब्राह्मणाचें सोंग घेतलें व तो त्यांच्याजवळ येऊन ह्मणाला, रे सत्वधिरा मीं. माझी गर्भिणी स्त्री व एक लहान मुलगा अशीं आह्मीं तिघेंजणें या अरण्यांतून चाललों आहों! परंतु तिघांच्याही पायांत पादरक्षा नसल्यामुळें या प्रखर सूर्यतापानें जमीन तप्त झाल्यामुळें फार हाल होतात. ते ऐकून, त्या दयासमुद्रानें. आपल्या जीवाची पर्वा न करितां, त्या ब्राह्मणाला त्रिवर्गांच्याही पादरक्षा देऊन त्याला संतोषित केला. धन्य त्या महात्म्याची ! रोहिदासाला तर फारच तहान लागली परंतु, कोठेंही पाणी दृष्टीस पडेना! विश्वामित्राच्या अगाध करणीनें नद्या, सरोवरें, विहिरी इत्यादि कोरड्या ठणठणीत पडल्या होत्या. त्यांनीं वारा वाहण्याचा बंद केला ! ! तीं फारच तान्हेलीं असतां, त्या विश्वामित्रानें, जवळच एक सुंदर उपवन निर्माण केलें व पाणपोई घातली. प्रथमतः हरिश्चंद्र त्या मार्गानें चालला असतां, त्याचा मोठा आदर करून तो मायावी ह्मणाला, हे राजेंद्रा, कोण हा प्रखर सूर्यताप !! घे, आणि थंड पाणी पिऊन अंमळ विश्रांति घे. तें ऐकून हरिश्चंद्र ह्मणाला. भूदेवा, पाणपोईचें पाणी आणि अन्नसत्रींचें अन्न. मीं घेत नसतों; असें ह्मणून तो पुढें चालला असता त्याच्या मागून तारामती राणी आली. तिलाही ब्राह्मणानें तसेंच सांगितलें व तिनेंही राजासारखेंच उत्तर दिलें असतां,

ब्राह्मणानें मायावी हरिश्चंद्र उत्पन्न करून, तो आश्रमांत शीतोपचार घेत बसला आहे. असें तिला दाखविलें असतांही, ती सत्पतिव्रता पुढें चालती झाली. याचप्रमाणें, रोहिदासालाही फसविण्याचा प्रयत्न केला, परंतु तोही सिद्धीस गेला नाहीं.

दैवगति विचित्र खरी ! जो सिंहासनावर बसून सकल पृथ्वीचें पालन करावयाचा, तो हरिश्चंद्र, अनवाणी, वल्कलें परिधान करून, कष्टमय अरण्यांतून चालला आहे; जिचें पदांगुष्ठ कधीं सूर्यालासुद्धां दिसावयाचें नाहीं, तीही तशीच पतीच्या मागून चालली आहे ! ज्याला शेंकडों राजांनीं निरंतर उचलून कडेवर घ्यावें, त्या रोहिदासाचीही काय दशा ही ! ! तशांत त्या पाषाणहृदयानें. त्या अरण्यास वणवा लाविला ! मग काय विचारितां ! जिकडे तिकडे हाहाःकार उसळला! पशुपक्षी जिकडे मार्ग सांपडेल तिकडे पळूं लागले. धूम्रानें आकाश व्याप्त झालें. त्या वेळीं, तारामतीची आणि हरिश्चंद्र व रोहिदास यांची चुकामुक झाली! तेव्हां त्या तारामतीच्या शोकाला तर पारावारच नाहींसा झाला ! हा नाथा ! हा पुत्रा ! असें ह्मणत ती सैरावैरां इकडे तिकडे फिरत असतां, तिच्या आंगाला विस्तवाचे चटके लागून, मोठमोठे फोड आले. पाय तर फाटून गेलेच होते! ती पुष्कळ वेळ फिरली; परंतु, त्यांचा शोध लागत नाहीं असें पाहून मनांत ह्मणाली कीं त्यांची गति कांहीं बरी दिसत नाहीं. ते या दावाग्नींत जळून गेले असावे. आतां आपणही हा देह अग्निनारायणाला अर्पण करून, स्वर्गलोकीं पतिपुत्राच्या भेटीस जावें.

इतक्यांत एकाएकीं तो प्रचंड अग्नि विझून गेला

विश्वामित्र ब्राह्मणाच्या रूपानें तारामतीजवळ येऊन ह्मणाला, हे स्त्रिये, तूं एकटीच या अरण्यांत कां फिरतेस? तेव्हां तारामतीनें त्यास ह्मटलें, महाराज, एक पुरुष व एक बालक यांस आपण पाहिलें काय?

तें ऐकून तो ह्मणाला, ते पहा, तिकडे सोरपकून मरून गेलेले दोन मनुष्य आहेत. चल तेथपर्यंत आणि तूं ज्यांस शोधितेस, तेच ते असतील तर पहा!

विश्वामित्रानें, हरिश्चंद्राचें व रोहिदासाचें अशीं दोन प्रेतें मायावी उत्पन्न करून तीं तारामतीस दाखविलीं असतां. तिला तीं पाहून महत् दुःख झालें! ती आक्रोशानें वक्षस्थळ पिटून शोक करूं लागली असतां, तिचा तो शोक ऐकून, पशुपक्षांसही रडें कोसळलें!! पण त्या पापाणाला यत्किंचित्सुद्धां तिची दया आली नाहीं. तो तिला ह्मणाला, बाई रात्र अंधारी आहे; तूं या प्रेतांजवळ एकटी बसून काय करशील? माझा आश्रम येथून जवळच आहे; तेथें रात्रीची रात्र राहून, प्रातःकाळ झाल्यावर तुला काय कर्तव्य असेल, तें कर. तें तारामतीला मानवलें नाहीं. ती ह्मणाली, महाराज, मीं पतीबरोबर सहगमन करणार, तें ऐकून ब्राह्मण ह्मणाला, तें कांहीं वाईट नाहीं; पण तुह्मांला ब्राह्मणाचें ऋण देणें आहे, त्याची फेड केल्याशिवाय, तुह्मांला उत्तमलोकप्राप्ति होणार नाहीं.

तारामती ह्मणाली, विप्रऋण फेडण्याकरितां, मीं दुसरा जन्म घेईन. तें ऐकून तो ब्राह्मण निघून गेला; अमावास्येच्या रात्रीसही मागें सारील, असा घोर अंधार पडला! ती राजस्त्री, पतिपुत्रांचें शव उरासीं धरून, आक्रोश करीत

होती; इतक्यांत, विश्वामित्रनिर्मित एक भयंकर व्याघ्र येऊन, त्यानें तीं दोन्ही प्रेतें उचलून नेलीं!

मग तर तारामतीच्या शोकास पारावारच नाहींसा झाला! इतक्यांत, असा चमत्कार झाला कीं, आकाशांत सूर्य दिसूं लागून, एकाएकीं तो काळोख नाहींसा झाला; हरिश्चंद्र आणि रोहिदास, हेही समोरून येतांना तारामतीला दिसले. तेव्हां तिनें धांवत जाऊन, त्यांच्या गळ्याला मिठी मारिली, व झालेलें सर्व वर्तमान त्यांस सांगितलें. तें ऐकून, राजाला दुःख आणि विस्मय वाटला!

तीं पुढें मार्ग क्रमूं लागलीं. सातव्या दिवशीं त्यांनीं तें पवित्र आणि जगप्रसिद्ध श्री वाराणसी क्षेत्र अवलोकन केलें. तिघांनींही भागीरथीचें स्नान करून, श्री विश्वेश्वराचें दर्शन घतलें. इतक्यांत, ब्राह्मणवेषधारी विश्वामित्र, तेथें येऊन ह्मणाला, राजा, आजचा दिवस शेवटचा आहे. माझी दक्षिणा देणें असेल तर दे नाहींतर नाहीं ह्मणून तरी सांग! तुझ्यामागें म्यां किती फिरावें?

राजा नम्रतेनें ह्मणाला, महाराज, मी आपल्या देहाचा विक्रय करून तुमची दक्षिणा देतों; असें ह्मणून त्यानें हातांतली मुद्रिका काढिली, व तिचें गवत विकत घेऊन, त्रिवर्गांनींही तें थोडथोडें डोक्यावर घेतलें; आणि ते चवाठ्याच्या ठिकाणीं जाऊन उभे राहिले. तेव्हां, हरिश्चंद्र स्वमुखानें लोकांस समजावें ह्मणून मोठमोठ्यानें "त्रिवर्गास कोणी विकत घ्या" असें ह्मणून ओरडत होता. तें ऐकून

---

१ यावरून त्या वेळीं माणसें विकण्याची चाल भारतांत होती, असें दिसतें.

तेथें गंमत पहावयास लोकांचा मोठा समुदाय जमला.

तारामतीचें लोकोत्तर सौंदर्य पाहून, एका कुंटिणीनें तिला विकत घेण्याचें मनांत आणिलें. व ती हिचें मोल काय? ह्मणून विचारूं लागली असतां विश्वामित्र ह्मणाला, हिचें एकभार सुवर्ण पडेल! आपल्याला आतां गणिकेचे घरीं जावें लागणार असें पाहून, तारामतीनें विश्वामित्र मुनीची फारच विनवणी केली. इतक्यांत, कालकौशिक नांवाचा ब्राह्मण येऊन, त्यानें एकभार सुवर्ण देऊन तारामतीला विकत घेतलें. तेव्हां हरिश्चंद्राला महदुःख झालें! रोहिदास तर मोठ्यामोठ्यानें रडूं लागला असतां, तारामतीच्या विनंतीवरून, त्या कालकौशिकानें अर्धभार सुवर्ण देऊन, त्यालाही विकत घेतलें!! हरहर ज्याच्या पायावर, नित्यशः हजारों राज्यांच्या मुकुटांचीं किरणें पडावीं, त्यानें डोक्यावर तृण धरून, स्वतःचा विकरा करावा काय? तस्मात् कालचक्राचा फेरा कांहीं विलक्षण आहे खरा!!

इतक्यांत, तेथें वीरबाहू नांवाचा अंत्यज येऊन, त्यानें दोनभार सुवर्ण देऊन हरिश्चंद्राला विकत घेतलें. तें साडेतीनभार सोनें विश्वामित्राला पोहोंचलेलें पाहून, आपण दक्षिणाऋणांतून मुक्त झालों. ह्मणून त्या सत्वधीर भूपतीला अत्यंत आनंद झाला. तो ह्मणाला मुनिराज, आपल्याऋणांतून मीं मुक्त झालों. आतां आपण अयोध्येस जाऊन, सुखानें राज्य करावें.

वीरबाहूनें, राजाला घरीं आणून, बायकोच्या स्वाधीन केलें; तेव्हां तिनें, त्याला पाणी भरण्याचें काम सांगितलें असतां, त्या छळक विश्वामित्रानें, त्याच्या चार घागरी फोडिल्या! तें पाहून, महाराणीला राग येऊन, तिनें हरिश्चं-

झाला लाथाबुक्यांचा यथेच्छ मार दिला!! हाय!हाय!! जो चक्रवर्ति रविकुलोत्पन्न सत्वधीर नृपति, त्याला अंत्यजस्त्रीनें लत्ताप्रहार करावा काय? तथापि सत्वरक्षणार्थ तितकेंही सहन करून, तो धन्याचें काम करीत असे. पाणी भरण्याचें काम याला येत नाहीं असें पाहून, तिनें राजाला दळावयास लाविलें. तेव्हां विश्वामित्र श्वानरूपानें येऊन सर्व पीठ खाऊन गेला. त्या वेळींही राजाला बराच मार मिळाला.

सायंकाळीं, कोरडें अन्न घेऊन, राजा गंगातीरीं आला, व पाकनिष्पत्ति करून गोग्रास व अतिताचा भाग काढून जेवावयास बसणार,इतक्यांत ब्राह्मणाच्या रूपानें विश्वामित्र तेथें आला,आणि राजाला ह्मणाला, यजमाना मीं तीन दिवसांचा उपवासी आहें! मला पोटभर जेवावयास घाल!!

त्याचें भाषण ऐकून राजाला मोठा संतोष झाला, तेव्हां त्या ब्राह्मणानें सगळें अन्न खाल्ल्यामुळें राजाला त्या दिवशीं उपास पडला! असेंच नित्य होत गेल्यामुळें, तो दिवसेंदिवस अगदीं रोड होत चालला, हा घरच्या कामाला उपयोगीं पडत नाहीं, असें पाहून वीरबाहूनें, त्यास स्मशानरक्षणार्थ ठेविलें.

कोणी प्रेत जाळावयास घेऊन आला असतां त्याजपासून द्रव्य घेऊन, नंतर त्यास प्रेत जाळूं द्यावें, असें वीरबाहूनें हरिश्चंद्रास सांगितलें! राजानें तें मान्य करून, तो त्या स्मशानांतील झोंपडींत राहिला.

इकडे, कौशिकगृहीं तारामती पाकनिष्पत्ति करून, राहिली होती. रोहिदासही त्या ब्राह्मणाचे शिष्यांबरोबर अध्ययन करून माता आणि गुरु, यांची सेवा करीत असे. एके दिवशीं, इतर शिष्यांबरोबर रोहिदास अरण्यांत, पूजा-

द्रव्य आणावयास गेला असतां, तलावांतील कमळें काढाव-यास तो पाण्यांत उतरला. त्यावेळीं विश्वामित्राचे आज्ञे-वरून तक्षकानें त्याला दंश केला, तेव्हां तो सुकुमार राजपुत्र तत्काळ गतप्राण होऊन पडला !!

हें दुःखदायक वर्तमान तारामतीला समजतांच, ती ऊर बडवीत तेथें आली ! रोहिदासाचें प्रेत पाहून, तिच्या शोकसिंधूला भरतें आलें ! त्या वेळीं तिनें जो कांहीं आ-क्रोश केला, त्याचें वर्णन करणें कठिण आहे !

तें पुत्राचें शव पुढें घेऊन तारामती रडत आहे, इत-क्यांत रात्र झाली ! बरीच रात्र गेल्यावर विप्रवेषधारी विश्वामित्र तिच्याजवळ येऊन ह्मणाला, मुली, तूं कोण आणि शोक कां करितेस ? तेव्हां तारामतीनें सर्व वर्तमान त्याला सांगितलें असतां तो आपल्याला दुःख झालें आहे असें दाखवून ह्मणाला, मग आतां रडून काय करणार ? प्रेताची पुढली व्यवस्था कांहीं तरी लाविली पाहिजे ! स्मशानभूमि जवळच आहे. रात्र आहे तोंपर्यंत याला दहन करशील तर बरें नाहीं तर उजाडल्यावर तो अंत्यज तुझ्यापासून पैसे घेतल्याशिवाय, प्रेत जाळूं देणार नाहीं!

तें प्रेत घेऊन तारामती स्मशानांत आली. ब्राह्मणानें चिता तयार केल्यावर तें प्रेत तिजवर ठेवून, त्याला अग्नि दिला. इतकें कृत्य करून, विश्वामित्र झोपडींत नि-जलेल्या हरिश्चंद्राला जागें करून ह्मणाला, अरे अशीच यजमानाची चाकरी करितोस काय ? ती पहा कोणी स्त्री द्रव्य दिल्यावांचून प्रेत जाळीत आहे !

तें ऐकून हरिश्चंद्र धांवतच तेथें आला; आणि चितेतून प्रेत बाहेर ओढून टाकून, त्या स्त्रीला दोनचार धक्के देऊन

ह्मणाला, तूं द्रव्य न देतां चोरून प्रेत जाळितेस काय ! तें पाहून, तारामती मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागली; तिला मागल्या गोष्टी आठवल्या ! पतीची स्मृति आली ती ह्मणाली देवा, हा हरिश्चंद्र राजाचा पुत्र रोहिदास, याची गति अशी व्हावी काय ?

आपलें नांव ऐकून हरिश्चंद्र मनांत विस्मित झाला; तेव्हां तो त्या स्त्रियेला ह्मणाला, तूं कोणाची कोण ? आणि इतक्या रात्रीं या स्मशानांत एकटीच येऊन प्रेत दहन कां करितेस !

तेव्हां तारामतीनें सर्व वर्तमान सांगितलें असतां, हरिश्चंद्रानें तिच्या गळ्याला मिठी मारून, तीं दोघेंहीं, पुत्रमरणानें दुःखित होऊन शोक करूं लागलीं. थोडा वेळ गेल्यावर, राजा शोक आंवरून ह्मणाला, प्रिये, जें व्हावयाचें होतें तें झालें आतां रोहिदासाच्या प्रेताला अग्नि दिला पाहिजे. परंतु, वीरबाहूला विचारल्याखेरीज तसें करितां येत नाहीं तर मी त्या माझ्या धन्याला विचारून येतों, तेथपर्यंत तूं येथेंच बैस.

असें ह्मणून तो धन्याची आज्ञा घेण्याकरितां, त्याच्या घराकडे गेला असतां, ब्राह्मणाच्या रूपानें विश्वामित्र तारामतीजवळ येऊन तिला ह्मणाला, या स्मशानांत तूं एकटीच प्रेताजवळ बसलीस, हें चांगलें नाहीं; भूतांचें वसतीस्थान हें! एखादा संमंध झडपील; याकरितां हें प्रेत घेऊन या जवळच्या शिवालयांत बैस.

ब्राह्मणाच्या सांगण्यावरून, तिनें तसें केलें असतां, त्या विश्वामित्रानें, तिला निद्रा येईल असें केलें, व ती निद्रिस्थ असतां रोहिदासाच्या प्रेताचें पोट फाडून त्यांतली

आंतडीं तिच्या गळ्यांत अडकावली, व तोंडास रक्त लावून तो तेथून निघून शहरांत आला; आणि मोठमोठ्यानें ओरडून लोकांस सांगूं लागला कीं, स्मशानाजवळच्या शिवालयांत कोणी एक डाकीण, पोरें मारून खात बसली आहे. तें ऐकून शेंकडों लोक धांवतच त्या मंदिराकडे आले. जे धीट होते, ते आंत शिरले. व त्यांनीं, जिचें तोंड रक्तानें माखलें आहे, अशा तारामतीला अवलोकन करून, तिचे केस धरून, तिला ओढीतच बाहेर आणिली! नंतर तिचे हातपाय बांधून, मारित मारित राजाकडे घेऊन गेले असतां, राजानें आज्ञा केली कीं, हिचा शिरच्छेद करावा!!

अपराध्याचा शिरच्छेद करण्याचें काम वीरबाहूकडे होतें राजसेवक त्याला बोलावूं गेले असतां, त्यानें एक पाणीदार तलवार हरिश्चंद्राजवळ देऊन, तें काम करून येण्याविषयीं आज्ञा केली. तव्हां तो हरिश्चंद्र, वधस्थानाजवळ आला.

त्यानें न्याहाळून पाहिलें तों, अपराधी प्रत्यक्ष स्त्रीच आहे, असें पाहून त्याला काय वाटलें असेल याची कल्पनाही होणें कठिण ! तथापि, त्या सत्वधीरानें, बाहेर बिलकुल दुःख न दाखवितां तो तारामतीचा शिरच्छेद करावयास सिद्ध झाला. तारामतीनेंही पतीला ओळखिलें. परंतु, सत्वहानी होईल, ह्मणून तीही उगीच राहिली.

तारामतीनें त्या पवित्र भागीरथी जलांत स्नान केलें, तिनें देवाची स्तुति करून ह्मटलें, **परमेश्वरा, हरिश्चंद्रासारखा पति, रोहिदासासारखा पुत्र, वसिष्ठासारखा गुरु आणि विश्वामित्रासारखा मागणारा,** असें मला जन्मोजन्मीं मिळावे.

हरिश्चंद्रानें तरवारीची धार पुसली; व तारामतीस मान

नीट करावयास सांगून, तिचा शिरच्छेद करावा ह्मणून, तरवार वर करून तो घाव मारणार इतक्यांत भक्त-प्रतिपालक, श्री विष्णुपरमात्मा घाईघाईनें येऊन त्यानें त्याचा हात धरिला! आणि अमृतवाणीनें ह्मणाला, धन्य धन्य, सत्वधीर राजा हरिश्चंद्रा, तुझ्यासारखा सत्वस्थ या त्रिभुवनांत एकही नसेल. तूं या आपल्या सद्गुणांनीं सूर्यवंशाची कीर्ति उज्वल केलीस. परमात्म्यानें तारामतीलाही हातीं धरून उठविलें. रोहिदास छिन्नभिन्न होऊन पडला होता, त्याजकडे अमृतदृष्टीनें पाहून, त्यालाही सजीव केलें.

---

१ विश्वामित्रानें, डाकिणीची ओरड नगरांत केल्यावर, कित्येक नागरीक तेथें येऊन, त्यांनीं तिला बाहेर काढिली. व मारित मारित घेऊन चालले असतां, कित्येकांच्या ह्मणण्यावरून, तिला सुळीं देण्याकरितां घेऊन गेले. इतक्यांत नारदमुनींना तें वृत्त समजून, ते धांवत धांवत विष्णुलोकीं गेले, व भगवान् विष्णुला ह्मणाले, देवाधिदेवा, मृत्युलोकीं भक्ताचा छल चालला आहे. आतां आपण किती अंत पहाणार!

तेव्हां भगवान विष्णु, शंकर व विधाता यांसह, तिघेही तीन विमानांत बसून, वाराणसी क्षेत्रांत, जेथें तारामतीला सुळीं देत होते, तेथें आले. भगवंतांनीं तारामतीला पोटासीं धरिलें, व अमृतदृष्टीनें अवलोकन केलें असतां रोहिदासही जीवंत झाला.

नंतर त्या दोघांस विमानांत बसवून, ज्या ठिकाणीं हरिश्चंद्र होता तेथें तीं विमानें आलीं असतां श्री विष्णूला पाहून हरिश्चंद्र ह्मणाला, देवा, मज दीनाकरितां आपण केवढे कष्ट घेतां? विष्णूसह सर्व देवांनीं हरिश्चंद्राची स्तुति करून त्याला परमात्म्यानें विमानांत बसविलें. व जें अक्षय मुक्तिपद वैकुंठभुवन, तेथें त्या सत्वधीर राजाला, स्त्रीपुत्रासह घेऊन गेला. 'कथाकल्पतरू'–स्त० ७ अ० १३.

तेव्हां तीं तिघेंही श्री चरणावर मस्तक ठेवून, त्यांनीं विष्णूची अपार स्तुति केली. अंतरज्ञानी वसिष्ठमुनींना, हें वृत्त समजून तेही तत्काळ तेथें आले. त्यांनीं परमेश्वराची स्तुति केली, व राजाला अशिर्वाद दिले; इतक्यांत ज्या-च्यामुळें त्या माहात्म्या हरिश्चंद्राला, स्त्रिपुत्रांसह एवढा त्रास भोगावा लागला तो, विश्वामित्रही तेथें आला. त्यानें पूर्ववचनाप्रमाणें आपल्या तपश्चर्येचें फळ त्याच वेळीं हरिश्चं-द्राला अर्पण करून, त्यानें आपलें वचन सत्य केलें.

या पूर्वीच श्री विष्णूचे मागोमाग शचीसहीत इंद्र, भवानीसहित शंकर आणि सावित्रीसह ब्रह्मदेव, त्या सत्वस्थ राजाला, पतिव्रताशिरोमणी तारामतीला, आणि बालवयीं असूनही त्या पुण्यात्म्या रोहिदासाला अवलोकन करावें, म्हणून तेथें आले होते. तेही हरिश्चंद्रादिकांना भेटून त्यांनीं त्याला आशिर्वाद दिले.

नंतर सर्व देव स्वस्थानीं गेल्यावर विश्वामित्रानें मोठ्या थाटानें राजा हरिश्चंद्राला स्त्रीपुत्रांसह अयोध्या नगरींत आणिलें असतां सर्व नागरिकांस मोठा आनंद झाला. नंतर सुमुहूर्त पाहून हरिश्चंद्रावर राजछत्र धरिलें. व रोहिदासाला युवराज्याभिषेक केला. आणि विश्वामित्र तपार्थ निघून गेला. त्या हरिश्चंद्रानें साठहजार वर्षें राज्य करून रोहिदासाला सिंहासनावर बसवून तो, तारामतीसह संपूर्ण अयोध्या-नगरवासी लोकांस बरोबर घेऊन, दिव्यदेही होऊन विमानांत बसला, आणि वैकुंठास गेला.



# ह्या मासिक पुस्तकास वर्गणीदार होऊन दरमहा बक्षिसें मिळवा!

ह्याचे आश्रयदाते मोठमोठे राजे रजवाडे आणि शेटसावकार असून नेपाळ, अरेबिया, मणिपूर इत्यादि दूरदूर ठिकाणीं हजारों प्रती जात असतात. १८९१ च्या जुलैपासून हें नियमानें प्रसिद्ध होतें. चालू सालीं कलाकल्पद्रुम या हेडिंगाखालीं फक्त १२ पानें क[illegible]ल्याचेच विषय येत असतात.

वर्ग[illegible] अ[illegible] वर्षाची वर्गणी टपाल खर्चासह १॥ रुपया पाठविणारांस मासिक पुस्तक मिळून शिवाय दरमहा २ पासून २५ पर्यंत रोख रुपये किंवा वर्षाकाठीं ७०० पृष्ठांचा शारंगधरसंहिता ग्रंथ फुकट मिळणार आहे. जुलै पासून आज पर्यंत रोखाचीं बक्षिसें एकेकास २।२ ३।३ वेळां सुद्धां मिळालीं


आहेत. वर्गणीदारांचीं नांवें, बक्षिसाची रक्कम इत्यादि माहिती दर अंकांत असते.

वर्ग दुसरा—वर्षाची वर्गणी टपाल खर्चासह ०१ आणे. बक्षिस वगैरे कांहीं नाहीं.

पत्ता—लोकमित्रकर्ते.
खानापूर—बेळगांव.

---

# भरतखंड.



हें मासिकपत्र नवीनच निघत असून यांत "देवीकुमुदिनी" नांवाची कादंबरी, ऐतिहासिक लेख, मनोरंजक गोष्टी, बोधपर निबंध, महत्वाचीं वर्तमानें इत्यादि विषय येत आहेत. वर्षाची वर्गणी टपाल खर्चासह ०८ आणे. नमुना मागवा.

भरतखंडकर्ते —खानापूर.

# धनंजय प्रेस.

या छापखान्यांत कानडी, मराठी व इंग्रजी अशा तीन जातीच्या टैपांवर लहान-मोठीं कामें स्वस्त दरानें, नियमीत वेळीं करून दिलीं जातात.

धनंजय प्रेसचे मालक.

# बुद्धिवर्धक पु० माला.

या मालेंत अनेक विषयांवरील आजपर्यंत दोनदोन आणे किंमतीस विकणारी धनुर्धारी वगैरे लेखकांनीं लिहिलेलीं अनेक पुस्तकें गोंविली आहेत. अर्धाआणा देणारास एक पुस्तक व एक पावती मिळते. ह्या मालेच्या पांच लक्ष वर्गणीदारांस ५ हजार रुपये बक्षिसांत वांटावयाचे आहेत.

लोकमित्रकर्ते.

# अनंतरंग.

वाजीकरणादि औषधांसह पूर्ण शृंगार किंमत ८१२ आणे.

# पद्यसुमांजली.

यांतील पदें, पोवाडे वगैरे फारच सुरस आहेत किंमत ८२ आणे.

सूचना—वरील दोन्ही पुस्तकें एकदम मागविणारांस ता० ३१ मार्च १८९८ पर्यंत निम्म्या किंमतीस ह्मणजे ८७ आण्यांस मिळतील. ट ख. निराळा.

पत्ता—लोकमित्रकर्ते—खानापूर.



# पौराणिक चरित्रमाला.

## पुस्तक पहिलें

चार आणे खर्च करून या चरित्रमालेचीं एक किंवा जास्त पुस्तकें जर खरेदी कराल तर प्रत्येक पुस्तकाबद्दल

**१ पासून १०० पर्यंत रोख रुपये.**

किंवा

कविराज भर्तृहरीकृत शृंगार, वैराग्य, अथवा नीति या शतकत्रयापैकीं एक, ज्यावर पंडितरा यांनीं रसाळ श्लोकरूपी मराठी भाषांतर केलें आहे असें आबालवृद्धोपयोगी नवीन पुस्तक

# बक्षिस मिळेल

बक्षिस समारंभ १९ जानेवारी ९८ रोजीं भारतीभवन लायब्ररींत जाहीर रीतीनें हजारों मंडळीसमक्ष होईल. ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत.